रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १७६ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## शहाजीबापूंच्या कार्यालयावर धाड

**सांगोला :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रचारात महायुतीमधील मतभेद चव्हाट्यावर आल्याचे दिसले. अशातच शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या कार्यालयाची भरारी पथकाने तपासणी केली. सांगोला येथील समारोपाची सभा संपताच ही कारवाई करण्यात आली. यावेळी कार्यालयाची कसून तपासणी केली. या कारवाईमुळे शिंदे गटाचे स्थानिक कार्यकर्ते चांगलेच नाराज झाले आहेत. तपासणीदरम्यान, कार्यालयातील सगळ्यांचे कामकाज थांबवण्यात आले. त्यामुळे आता शिवसेना-भाजपा यांच्यातील वाद आणखी चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

रायगड, मंगळवार, दि. २ डिसेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## मराठी पंतप्रधान होण्याचा दावा

**सातारा :** राज्यातील नगरपालिका मतदानाच्या एक दिवस अगोदर राज्यातील काही निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. त्यावरुन, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कराडमध्ये पत्रकार परिषद घेऊन आपला संताप व्यक्त केला. निवडणूक आयोगाने गोंधळ घातला, याला सरकार जबाबदार आहे, असे त्यांनी म्हटले. एपस्टाईन फाईल्सवरुन अमेरिकेत गेल्या ६ महिन्यांपासून मोठा गदारोळ आहे, ती फाईल उघड झाल्यावर भारताच्या राजकारणावरही त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. कदाचित महिनाभरात मराठी माणूस देशाचा पंतप्रधान होऊ शकतो, असे खळबळजनक वक्तव्य त्यांनी केले.



(छायाचित्र : समीर मालोदे)



# आज मतदान




**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील १० नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा सोमवारी (दि.१) रात्री दहा वाजता थंडावल्या. या निवडणूकीत नगरसेवकपदाच्या २१७ जागांपैकी ८ नगरसेवक बिनविरोध निवडून आले. त्यामुळे २०९ नगरसेवक जागांसाठी तर नगराध्यक्षपदाच्या १० जागांसाठी लढत होणार आहे. एकूण २१९ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. मंगळवारी (दि.२) सकाळी साडेसात ते साडेपाच या वेळेत मतदान होणार आहे. मतदान २८१ केंद्रांमध्ये होणार आहे. या प्रक्रियेत •> पान २ वर

> **मतदान प्रक्रीया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी स्थानिक पोलीस ठाण्यातील प्रभारी पोलीस अधिकारी यांना सुचना केली आहे. ठिकठिकाणी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मतदारांना निर्भीडपणे भयमुक्त वातावरणात मतदान करता यावा, या पद्धतीने नियोजन करण्यात आले आहे. हातभर समस्यांचा बोटभर उपाय यानुसार प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावण्याचे काम करणे गरजेचे आहे.**
>
> **- आंचल दलाल**
> पोलीस अधीक्षक, रायगड

## गावगुंडाना पोलिसांचा दणका

**प्रमोद जाधव**
**। रायगड ।**

■ **नगरपरिषद निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस सज्ज**

■ **१ हजार ५५१ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई**

रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी १ हजार ५५१ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यांना चांगल्या वर्तणूकीची तंबी देत चांगल्या वागणुकीचे हमीपत्र त्यांच्याकडून लिहून घेण्यात आले आहे. त्यामुळे या गावगुंडांना पोलिसांनी दणका दिल्याचे चित्र आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, खोपोली, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या दहा नगरपरिषदेच्या निवडणूकीचे मतदान आज (दि.२) पार पडणार आहे. ही प्रक्रीया शांततेत पार पाडावी. नागरिकांना निर्भीडपणे मतदान करता यावे, यासाठी रायगड पोलीस सुरक्षेच्या दृष्टीने सज्ज झाले आहेत. या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील पोलीस कामाला लागले आहेत. निवडणूक प्रक्रीया सुरळीत व शांततेत होण्यासाठी पोलिसांनी प्रत्येक संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे. निवडणूकीच्या काळात कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवरही पोलिसांनी कारवाईचे सत्र सुरु केले आहे.

नगरपरिषद निवडणूकीच्या निमित्ताने रायगड पोलीस दलाने महिन्याभरापासून तयारी सुरु केली आहे. वेगवेगळ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचे याबाबत प्रशिक्षण घेण्यात आले आहे. ही प्रक्रीया पारदर्शक व शांततेत पार पाडण्याठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. मतदारांवर वेगवेगळ्या पद्धतीने दबाव टाकणारे, सराईत गुन्हेगारांची माहिती घेऊन त्यांच्याविरोधात कारवाई देखील सुरु केली असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. जिल्ह्यातील १ हजार ५५१ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. भारतीय नागरी सुरक्षा संहिता या कलमांतर्गत ही कारवाई करण्यात आली असून निवडणूकीच्या कालावधीत दारु निर्मिती, वाहतूक व विक्री करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यात आले आहे. ९३ जणांविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

### १९ केंद्रामध्ये मतदान

अलिबाग नगरपरिषदेच्या निवडणूकीत नगराध्यक्षपदासाठी मविआतील शेकाप व काँग्रेसच्या उमेदवार अक्षया नाईक यांच्यासह दोघेजण रिंगणात आहेत. नगरसेवकपदासाठी मविआचे उमेदवार प्रशांत नाईक बिनविरोध निवडून आल्यामुळे आता नगरसेवकपदाच्या १९ जागांसाठी ४२ उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. अलिबागच्या निवडणूकीचे मतदान १९ केंद्रामध्ये होणार आहे.

### हे आहेत महाविकास आघाडीचे उमेदवार

थेट नगराध्यक्षपदासाठी अक्षया प्रशांत नाईक, नगरसेवकपदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधूकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर. प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील. प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील. प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे. प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समिर मधूकर ठाकूर. प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्वीनी ठोसर. प्रभाग सातमधून ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर. प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा. प्रभाग नऊमधून योजना प्रदिप पाटील, सागर शिवनाथ भगत. प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत हे महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

### हजारो पोलिसांची राहणार नजर

जिल्ह्यातील दहा नगरपरिषद निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. मतदान २ डिसेंबरला आहे. त्यामुळे मतदानाच्या दिवशी कोणताही गैरप्रकार घडू नये, म्हणून १ हजार ३४१ पोलिसांचा बंदोबस्त या ठिकाणी असणार आहे. त्यात ४०० होमगार्ड जवान, ६९ पोलीस अधिकारी, ८७२ पोलीस अंमलदारांचा समावेश असणार आहे.

### तडीपारसह शस्त्रसाठा जप्त

नगरपरिषद निवडणूकीत काही गैरप्रकार व दुखापत होऊ नये यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. गावांमध्ये गुंडगिरी करणाऱ्यांसह अधिक गुन्हे दाखल असलेल्या गुंडाना चपराक बसवली आहे. एकूण ६ जणांना हद्दपार करण्यात आले असून १ हजार १९८ जणांकडून शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे.

### उद्या निकाल

रायगड जिल्ह्यातील १० नगरपालिकांसाठी आज मतदान होणार असून उद्या दि.३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे मतदारांनी कुणाला कौल दिले, याचा निकाल बुधवारी समजणार आहे. राज्यातील काही नगरपालिका निवडणूकांचा निकाल निवडणूक आयोगाने पुढे ढकलला असला तरी रायगडमधील सर्वच नगरपालिकांचा निकाल ठरलेल्या दिवशीच होणार असल्याने मतदार तसेच उमेदवारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## रेल्वेच्या मोटरमनला ५५ लाखांचा गंडा

**पनवेल :** पनवेलमधील रेल्वे मोटरमनला ५५ लाखांचा गंडा घातल्याची घटना घडली आहे. त्याला फेसबुकवर शेअर मार्केट संबंधीची जाहिरात दिसली. त्याने त्या जाहिरातीतील लिंक उघडली असता त्याला देशाबाहेरील नंबरवरून फोन येणे सुरू झाले. त्या व्यक्तींकडून ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवणूक करून अधिकाधिक नफ्याचे आमिष दाखविण्यात आले. त्याला भुलून मोटरमनने ५५ लाख ६७ हजार रुपये अज्ञाताच्या बँक खात्यावर पाठवले होते. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली.




**● जुन्या पनवेल महामार्गावरील बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर एनएच ४-चिखले व शेडुंग फाटा-नेरे रस्ता दुरुस्ती करण्याकरता शेकापतर्फे आमरण उपोषण करण्यात आले. यावेळी सरपंच अनिल ढवळे यांच्यासह शेकापचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

## उरणमध्ये निकृष्ट बांधकामांचा धुमाकूळ

**। उरण । प्रतिनिधी ।**

■ **प्रशासनाकडून बिल्डरांना अभय**

■ **कामगारांच्या सुरक्षेची पायमल्ली**

उरण नगरपालिका निवडणुकी काळातही शहरात पुनर्विकासाच्या नावाखाली मोठमोठे टॉवर उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाकडून बिल्डरांना अभय मिळत असल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. मुख्याधिकारी समीर जाधव, नगररचनाकार निकम आणि बांधकाम विभागाच्या संरक्षणछत्राखाली अनेक प्रकल्पांवर निकृष्ट दर्जाचे काम सुरू असून कामगारांच्या सुरक्षेची कोणतीही काळजी घेतली जात नसल्याचे देखील उघड झाले आहे.

उरणमध्ये नगरपालिका निवडणूकीची धामधूम सुरू असताना विमला तलाव परिसरात एका इमारतीचे काम सुरू आहे. त्या इमारतीवरून साहित्य कोसळून एका कामगाराच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली आहे. त्याच्यावर इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून डॉक्टरांकडून या अपघाताबाबत कोणतीच खबरदारी न घेतल्याने संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यातच अशा गंभीर अपघाताची कोणतीही नोंद पोलीस ठाण्यात नसल्याचे समोर आले आहे. या संदर्भात जखमी कामगारासह इतर कामगारांकडे विचारणा केली असता, आम्ही कितीही मागणी केली तरी बिल्डर आम्हाला कोणतीही सुरक्षा उपकरणे देत नाही, अशी थेट कबुली त्यांनी दिली. तर, बिल्डरकडे विचारणा केली असता, हे काम मी दुसऱ्याला दिले आहे. त्यामुळे ही माझी जबाबदारी नाही, असे सांगून त्यांनी जबाबदारी पूर्णपणे झटकून टाकली. त्यामुळे कामगारांच्या जीवाशी निगडित सुरक्षेच्या प्रश्नावर अशी बेफिकिरी गंभीर चिंतेचा विषय ठरत आहे.

उरण शहरातील अनेक पुनर्विकास प्रकल्पांमध्येही नियमांची उघडपणे पायमल्ली होत असल्याचे चित्र आहे. आनंदनगर परिसरातील इमारत रस्त्याच्या कडेलाच उभारण्यात आल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. प्रशासकीय कारभार गेली काही वर्षे सत्ताधाऱ्यांच्या •> पान २ वर

## मतदानाआधी सापडलं घबाड

**हिंगोली :** राज्यात निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून जवळपास अडीचशेपेक्षा जास्त नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी मतदान होत आहे. त्यातच, हिंगोली शहरात चारचाकी गाडीमधून १ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. संपूर्ण रोकड घेऊन निवडणूक निर्णय अधिकारी त्यांच्या कार्यालयात दाखल झाले. निवडणूक काळात मतदानाच्या आदल्या दिवशी एवढ्या मोठ्या प्रमाणात रोकड सापडल्याने खळबळ उडाली आहे.

## निवडणूक कार्यक्रमात अनेक त्रुटी

### बाळासाहेब थोरातांची आयोगावर टीका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजावर तीव्र टीका केली आहे. आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमात अनेक त्रुटी असून निर्णय प्रक्रियेत गंभीर शंका निर्माण होत असल्याचे ते म्हणाले आहेत.

बाळासाहेब थोरात म्हणाले की, सुप्रीम कोर्टाने २१ जानेवारीला आरक्षणाबाबत स्पष्ट निर्देश दिले असून चुकीच्या पद्धतीने पुढे जाऊ नका, असा सल्ला दिल्यानंतरही निवडणूक आयोग हलगर्जीपणे वागत आहे. अचानक निवडणुका रद्द करणे, पुढे ढकलणे यामुळे उमेदवारांपासून ते सामान्य मतदारांपर्यंत सर्वांना त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. उमेदवारांनी महिनोन्महिने प्रचारासाठी परिश्रम घेतले. आता पुन्हा २० दिवसांचा कार्यक्रम दिला आहे. या विलंबाची जबाबदारी कोण घेणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. याशिवाय, निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप वाढल्याचा आरोप •> पान २ वर

## भाजपच्या उमेदवारावर मतदारांकडून टीका

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची आणि चर्चेची बाब समोर आली आहे. शासकीय सेवेत असताना लाचलुच-पत प्रकरणात अटक झालेल्या अप्पर कोषागार अधिकाऱ्याच्या जवळच्या नातेवाईकाने भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावरून निवडणुकीत प्रवेश केला असून त्यामुळे शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे.

अलिबागमधील अपर कोषागार असलेले रमेश इंगळे यांना लाच घेताना अडीच वर्षापुर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले होते. अलिबाग पोलीस ठाण्यात याची नोंददेखील असून नोंद क्रमांक ३२ अशी आहे. इंगळे हे कार्यरत होते. तक्रारदाराने त्यांचे वैद्यकिय बिल मंजूर करण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयात अर्ज केला होता. हे बिल मंजूर करण्यासाठी २ हजार रुपयांची मागणी केली होती. लाचलुचपत विभागाककडून लाच घेतल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली होती. २२ जून २०२३ मध्ये ही घटना घडली होती. या घटनेनंतर बराच काळ गेला असला, तरी नगरपरिषदेच्या निवडणूकीत ला-चखोराचे नातेवाईक उभे राहिल्याने वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे. शासकीय सेवेत लाच घेतल्याच्या आरोपानंतर जवळच्या नातेवाईकाला पक्षाने उमेदवारी देणे योग्य आहे का, या मुद्द्यावरही शहरभर कुजबुज सुरू आहे. विशेष म्हणजे, इंगळे हे निवृत्तीला काही महिने शिल्लक असताना कारवाई झाली होती. स्थानिक नागरिकांमध्ये भाजपच्या निवडणूक धोरणा-वरही प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अडकलेल्या व्यक्तीने पक्षात प्रवेश केला की त्याला क्लीनचिट मिळते, अशी टीका काही नागरिकांकडून होत आहे.

**फॉग कॅननवाहनाच्या माध्यमातून पाणी फवारणी | दररोज ५० किमीपर्यंत तुषार फवारणी**

## पनवेल पालिकेकडून १६९ बांधकामांना नोटीस

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

वाढत्या हवा प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार शहरातील सर्व प्रभागांमध्ये तपासणी, कारवाई आणि यंत्रणांची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू आहे. यादरम्यान पालिकेकडून प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पालिका क्षेत्रातील



बांधकाम व्यावसायिकांना एकूण १६९ नोटिसा बजावल्या आहेत. तसेच खारघर, तळोजा, कामोठे-कळंबोली व पनवेल येथे चार फॉग कॅनन या वाहनांद्वारे दररोज ५० किमीपर्यंत तुषार फवारणी करून हवेतील धूळ नियंत्रण केले जात आहे.

पनवेल पालिकेने न्यायालयीन निर्देश व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने प्रदूषण नियंत्रणाचे उपक्रम अधिक गतीमान केले आहेत. खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा व पनवेल या प्रभागांमध्ये उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथके नियुक्त करण्यात आली असून बांधकाम व्यावसायिकांकडून धूळ नियंत्रणासंबंधी शासन •> पान २ वर

### हवा प्रदूषण नियंत्रण समिती सक्रिय

प्रत्येक प्रभागात स्थापन करण्यात आलेल्या समित्या, नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकामांवर थेट कारवाई करत असून त्यांचा अहवाल आयुक्तांना सादर केला जात आहे. तसेच, हवेतील धुळीचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी खारघर, तळोजा, कामोठे-कळंबोली व पनवेल येथे चार फॉग कॅनन या वाहनांद्वारे दररोज ५० किमीपर्यंत तुषार फवारणी करून हवेतील धूळ नियंत्रण केले जात आहे.

## दीड कोटीची विना परवाना दारू जप्त

**। महाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावर दारूबंदी विभागाने शनिवारी (दि.२९) केलेल्या धडक कारवाईत १ कोटी ६० लाख रुपयांची विनापरवाना गोवा बनावटीची दारू जप्त केली आहे. दासगाव हद्दीत ट्रक अडवून तपासणी दरम्यान उघडकीस आलेल्या या साठ्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मागील काही महिन्यांतील ही दारूबंदी विभागाची सर्वात मोठी कारवाई ठरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दारूबंदी विभाग भरारी पथक मुंबई यांना एक ट्रक विना परवाना गोवा ते मुंबई दारू घेऊन जाणार आहे,




अशी गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारावर त्यांनी महाड तालुका हद्दीतील मुंबई-गोवा महामार्गावर सापळा रचला आणि त्या ट्रकचा महाडवरून पाठलाग करत दासगाव गाव हद्दीत थांबवून कसून चौकशी केली. त्यावेळी त्या ट्रकमध्ये १ कोटी ६० •> पान २ वर

# बल्लाळेश्वर तलावाला वाली कोण?

## • सुशोभिकरणामुळे नैसर्गिक सौंदर्याला बाधा • पाणवनस्पतींमुळे जैवविविधता धोक्यात



। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल हे एकेकाळी तलावांचे गाव म्हणून प्रसिद्ध होते. सध्या पनवेल फक्त एका तलावासाठी लोकांना माहिती आहे, ते म्हणजे बल्लाळेश्वर अथवा वडाळे तलाव. पनवेल महानगरपालिका झाल्यापासून आयुक्त तसेच राजकारण्यांना पनवेलमधील बल्लाळेश्वर तलाव एवढी एकच वस्तू सुशोभिकरणासाठी दिसत आहे. इतर तलाव मरणासन्न अवस्थेत असताना, येथील राजकारणी आणि सरकारी अधिकाऱ्यांनी बल्लाळेश्वर तलाव सुशोभीकरणावर प्रचंड जोर लावला आहे. हे सुशोभीकरण म्हणजे तलावाच्या नैसर्गीक सौंदर्याला बाधा करून त्याचे रूपांतर अनैसर्गिक पार्कमध्ये बदलण्याचा घाट घातला जात असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. तसेच, एवढे सुशोभीकरण करून देखील या तलावातील जैवविविधता धोक्यात आली आहे. त्यामुळे या तलावाला वाली कोण, असा प्रश्न येथील नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

बल्लाळेश्वर (वडाळे) तलावात सध्या विदेशी पाणवनस्पती प्रचंड प्रमाणात पसरल्या आहेत. अशीच परिस्थिती राहिल्यास लवकरच बल्लाळेश्वर तलाव मच्छर उत्पादन केंद्रात बदलेल आणि पनवेलच्या नागरिकांना डेंग्यू, मलेरिया सारख्या आजारांना बळी पडावे लागेल.त्यामुळे महानगरपालिकेने निवडलेल्या कॉन्ट्रॅक्टरला मोठी सुट्टी देण्यात आली आहे की काय, असा सवाल नागरिक विचारत आहेत. त्यामुळे एकमेव जैवविविधता असलेला तलाव मृत करण्याच्या मागे हात धुवून लागलेली महानगरपालिका लवकरच या कामात यशस्वी होणार असल्याचे बोलले जात आहे. सध्या थंडीच्या आगमनाबरोबर बदके आणि इतर जातीच्या पक्षांनी तलाव परिसरात येण्याची उत्सुकता दाखवली आहे. परंतु, या विदेशी पाणवनस्पतींमुळे त्यांना स्वच्छंद भटकंती आणि खाद्य शोधण्यास अडचण येत आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील हे एकमेव जिवंत तलाव शिल्लक राहिले असून याठिकाणी पावसाळी पाहुणे अगदी हक्काने भेट द्यायचे; परंतु, पनवेल महानगरपालिकेच्या अधिकारी यांना पनवेलच्या बल्लाळेश्वर तलावाच्या सद्यःस्थितीबद्दल काहीच पडले नसल्याचे बोलले जात आहे. वारंवार सांगूनही विदेशी वनस्पतीची वाढ रोखण्यास पनवेल महानगर पालिका सपशेल अपयशी ठरल्याची नागरिकांमधून चर्चा होत आहे.

> **सततचा पाठ पुरवठा केल्यानंतरही अधिकारी पुढे काहीच हालचाल करत नाहीत. ते कॉन्ट्रॅक्टरला पुढे करून चालढकल करत आहेत. आम्ही स्वतः कॉन्ट्रॅक्टरला भेटून स्व इच्छेने मदत करायला तयार आहोत. तसेच, कटेकर या अभियंत्यास भेटून तलावात कसे आणि कोणते जीव असावेत हे कळवले आहे. परंतु, गरज पडेल तशी सर्व मदत करण्याची तयारी दाखवून सुद्धा आत्तापर्यंत कुणीही संपर्क साधलेला नाही.**
>
> **– सुदीप आठवले, अनुभूती संस्था**



# एड्स जनजागृती कार्यशाळा संपन्न

। उरण । प्रतिनिधी ।

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभाग आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

हा कार्यक्रम कार्यवाह प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य गजानन चव्हाण होते. तर, जेएनपीए हॉस्पिटलच्या डॉ. वर्षा यादव या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच, आरोग्य सेवा कर्मचारी उज्वला निकाळजे, सुषमा म्हात्रे आणि पूजा गावंड उपस्थित होते.

आरोग्य सेविका उज्वला निकाळजे यांनी एड्स विषयक मूलभूत माहिती, प्रतिबंध आणि जनजागृतीचे महत्त्व यावर प्रबोधनपर व्याख्यान दिले. डॉ. वर्षा यादव यांनी विद्यार्थ्यांची जागरूकता वाढवून समाजातील एड्ससंबंधित गैरसमज व कलंक दूर करण्याची गरज यावर भर दिला. एड्स मुळे होणारे मानवी श्रमशक्तीचे नुकसान व आरोग्य सेवेवरील ताण तणाव याची सखोल माहिती दिली. गजानन चव्हाण यांनी एड्स रुग्णांप्रती समाजातील वर्तनाची उदाहरणे सांगितली आणि विद्यार्थ्यांनी संवेदनशीलता तसेच स्वतः च्या आरोग्याबाबत जागरूक राहण्याचा सल्ला दिला.

# पिरकोन येथे रक्तदान शिबीर संपन्न



। उरण । प्रतिनिधी ।

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ पवित्र दान आहे. त्यामुळे अनेकांना जीवदान मिळते. गरीब असो वा श्रीमंत, कुणालाही परिस्थितीनुरूप रक्ताची गरज लागते. त्यामुळे न्हावाशेवा सी.एच.ए. आधार सामाजिक संघटनेचे रक्तदान शिबीर भरवण्याचे काम अतिशय महत्त्वपूर्ण आहे. गेली अनेक वर्षे संघटनेचा सुरू असलेला उपक्रम कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी काढले. पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात तेरणा ब्लड बँक नेरूळच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.३०) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या शिबिराला काँग्रेसचे उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, अविनाश ठाकूर तसेच काँग्रेसचे कार्यकर्ते, न्हावाशेवा सी.एच.ए. आधार सामाजिक संघटनेचे सदस्य आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## पाच डिसेंबरला शाळा बंद आंदोलन

**उरण:** शिक्षकांसमोर उभ्याटाकलेल्या संच मान्यता शासन निर्णय आणि टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) या संदर्भाने शिक्षकांच्या सेवेची शाश्वतीच उरलेली नाही. सेवेत असलेले शिक्षक हे अत्यंत भयग्रस्त झालेले आहेत. या अन्यायकारक कायद्याला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षक संघटना, माध्यमिक शिक्षक संघटना शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांच्या समन्वय समितीच्यावतीने महाराष्ट्रभर ५ डिसेंबर रोजी शाळा बंद आंदोलन करण्यात येणार आहे.

# जेएनपीएतर्फे कार्यशाळेचे आयोजन

। उरण । प्रतिनिधी ।

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने शुक्रवारी (दि.२८) कामगार आणि रोजगार मंत्रालय आणि महानिदेशालय, कारखाना सल्ला सेवा आणि श्रम संस्थान यांच्या सहकार्याने 'गोदी सुरक्षा व धोकादायक रसायनांच्या हाताळणी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. जेएनपीए बिझनेस फॅसिलिटेशन सेंटर येथे आयोजित या कार्यशाळेत बंदर प्रशासन, टर्मिनल ऑपरेटर्स, सुरक्षा तज्ज्ञ, आपत्कालीन प्रतिसाद पथके आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी सहभाग घेतला. बंदरांवर हाताळल्या जाणाऱ्या धोकादायक मालाविषयी जागरूकता वाढवणे आणि कार्यप्रणालीतील सज्जता अधिक बळकट करणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता.

हा उपक्रम म्हणजे आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींचा नियमित बंदर कार्यप्रणालीमध्ये समावेश करून एक सक्षम, सुरक्षित आणि नियमांचे पालन करणारा कार्यपरिसर निर्माण करण्यासाठी जेएनपीएच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग आहे. या कार्यशाळेत तज्ज्ञांच्या नेतृत्वाखालील तांत्रिक सत्रांची मालिका होती ज्यात महत्त्वाच्या सुरक्षा विषयांचा समावेश होता. या कार्यक्रमाला जेएनपीएचे उपसंरक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांच्यासह जेएनपीएचे सर्व विभागप्रमुख व मुख्य अतिथी अणुऊर्जा नियामक मंडळाचे अध्यक्ष दिनेश कुमार शुक्ला, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे माजी सदस्य डॉ. डी.एन. शर्मा, डीजीएफएएसएलआयचे उपमहासंचालक सुमित रॉय, आयआयटी मुंबई येथील रासायनिक अभियांत्रिकीचे प्राध्यापक डॉ. संदीप रॉय आदी मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून

## आज मतदान

२ लाख ४२ हजार ५२९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांच्या निवडणूकीचे मतदान २ डिसेंबरला होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. मतदानापासून मतमोजणीसाठी लागणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. त्यामुळे यंत्रणा सज्ज आहे. सुमारे दोन हजारांहून अधिक कर्मचारी या निवडणुकीच्या कामासाठी लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, खोपोली, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या नगरपरिषदांमध्ये नगरसेवकपदासाठी ५९५ व नगराध्यक्षपदासाठी ३४ असे एकूण ६२९ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत. या नगरपरिषदांच्या हद्दीत १०७ प्रभाग आहेत. नगराध्यक्षपदाच्या दहा आणि नगरसेवकपदाच्या २१७ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. खोपोलीमध्ये नगराध्यक्षपदासाठी सात व नगरसेवकपदासाठी ११८, अलिबागमध्ये नगराध्यक्षपदासाठी २ व नगरसेवक पदासाठी ४२, श्रीवर्धनमध्ये नगराध्यक्षपदासाठी ४ आणि नगरसेवक पदासाठी ६०, मुरूडमध्ये नगराध्यक्ष पदासाठी ३ व नगरसेवक पदासाठी ५८, रोह्यात नगराध्यक्षपदासाठी २ व नगरसेवकपदासाठी ५१, महाडमध्ये नगराध्यक्षपदासाठी ५ व नगरसेवकपदासाठी ५३, पेणमध्ये नगराध्यक्षपदासाठी ३ व नगरसेवकपदासाठी ७२, उरणमध्ये नगराध्यक्षपदासाठी ४ आणि नगरसेवकपदासाठी ४९, कर्जतमध्ये नगराध्यक्षपदासाठी २ आणि नगरसेवक पदासाठी ४६, माथेरानमध्ये नगराध्यक्षपदासाठी २ व नगरसेवक पदासाठी ४६ उमेदवार आहेत. या उमेदवारांमध्ये अंतिम लढत होणार आहे.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. मतदान दोन डिसेंबरला २८१ केंद्रांमध्ये होणार आहे. दोन लाख ४२ हजार ५२९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यात एक लाख १८ हजार ४२३ महिला व १ लाख १९ हजार ७८ पुरुष मतदारांसह मतदारांचा समावेश आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासाकडून तयारी जोरात करण्यात आली आहे. जिल्ह्यातून सुमारे दोन हजार कर्मचारी नियूक्त करण्यात आले आहेत. मतदान केंद्रापासून शंभर मीटर परिसरात गर्दी करण्याबरोबरच विनाकारण फिरणाऱ्यांना बंदी घालण्यात आली आहे. मतदान केंद्रापासून शंभर मीटर परिसरात व केंद्रापर्यंत ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात केली जाणार आहे.

**पालिकास्तरावर मतदार संख्या**

**नगरपरिषद – मतदान केंद्र – मतदार – स्त्री – पुरुष**

खोपोली – ६६ – ६७१०२ – ३०,४४२ – ३१,६३१
अलिबाग – १९– १६३५४– ८,२०७ – ८,१४७
श्रीवर्धन – २० – १२६३७ – ६,४३५ – ६,२०२
मुरूड– – १७ – ११५४४ – ६,१०४ – ५,४४०
रोहा – २० – १७६६७ – ९,०२८ – ८,६४१
महाड – २६ – २३१२४ – ११,६३३ – ११,४९१
पेण– ४१ – ३३८७५ – १६,६०४ – १७,२७१
उरण –२९ – २६२१४ – १२,९०३ – १३,३११
कर्जत – ३३ – २९९५७ – १४,९११ – १५,०४५
माथेरान – १० – ४०५५ – २,१५६ – १,८९९
एकूण –२८१ – २,४२,५२९ – १,१८४२३– १,१९०७८

## निवडणूक कार्यक्रमात अनेक त्रुटी

करताना, थोरात म्हणाले की, पूर्वीचे निवडणूक आयुक्त स्वायत्त होते. सत्ताधारीही त्यांना घाबरत असत. मात्र, आता केंद्रापासून राज्यापर्यंत सत्ताधाऱ्यांच्या सूचनांनुसार काम चालते. त्यामुळे गोंधळ वाढला आहे. असे थोरात म्हणाले. तसेच, या चुकांची शिक्षा जनतेने नव्हे तर आयोगाच्या अधिकाऱ्यांनी भोगावी. निवडणूक प्रक्रियेत साधलेला गोंधळ हा आयोगाच्या चुकीच्या नियोजनाचा परिणाम असून, त्यावर कडक कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## फॉग कॅननवाहनाच्या माध्यमातून पाणी फवारणी

नियमांचे पालन होते का, याची खातरजमा करण्यात येत आहे. नुकतीच कामोठे आणि खारघर प्रभाग समिती क्षेत्रातील विविध बांधकाम स्थळांची पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान उप आयुक्त स्वरूप खारगे यांनी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी उच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या १५ मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे बांधकाम स्थळांवरील उपाययोजनांची प्रत्यक्ष तपासणी केली. यादरम्यान, महापालिका प्रशासनाने प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पालिका क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिकांना एकूण १६९ नोटिसा बजावल्या आहेत.

**प्रभाग–नोटीस संख्या**
**प्रभाग समिती 'अ' (खारघर)–१९**
**नावडे उपविभाग– ३८**
**प्रभाग समिती 'ब' (कळंबोली)– ३५**
**प्रभाग समिती 'क' (कामोठे)– १९**
**प्रभाग समिती 'ड' (पनवेल)– ५८**
**एकुण– १६९**

**आधुनिक मॉनिटरिंग सिस्टीम**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तळोजा एमआयडीसी भागात, कामोठे जव्हार इंडस्ट्रीयल व पनवेल इंडस्ट्रीयल भागात विविध कंपन्यामुळे परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होत आहे. त्यामुळे पनवेल शहरातील निवासी भागामधील हवेतील विविध घटकांची पातळी आणि हवामान घटकांचे निरीक्षण/मोजमाप करून नागरिकांना अचूक माहिती देण्यासाठी मंकी पॉइंट, उत्सव चौक, नाका, कळंबोली प्रवेशद्वार, कामोठे पोलीस स्टेशन, संताजी महाराज जगनाडे चौक व वडाळे तलाव अशा ७ ठिकाणी रिअल टाईम अम्बिएंट एअर क्वालिटी डस्ट मॉनिटर अ‍ॅण्ड मेट्रॉलॉजिकल पॅरामिटरर्स स्थापित करण्यात आले आहेत. सध्या कोपरागाव, खारघर राणी लक्ष्मीबाई चौक, नावडे लेबर नाका, कळंबोली हॉस्पिटल समोर, कामोठे प्रवेशद्वार अशा ५ ठिकाणी एअर प्युरिफिकेशन सिस्टीम कार्यरत आहेत. तर, आणखी ५ ठकाणी एअर प्युरिफिकेशन सिस्टीम बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## नगरपालिका प्रशासनाकडून बिल्डरांना अभय

दबावाखालीच चालल्याने या अनियमिततेकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचे आरोप कायम आहेत. उरण शहरातील बांधकामातील अनियमितता, निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि कामगारांच्या सुरक्षेचा बोजवारा यावर तात्काळ लक्ष देण्याची गरज असून, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## दीड कोटींची विनापरवाना दारू जप्त

लाख रुपयांचे अंदाजे १३०० रॉयल सिलेक्ट या दारूचे बॉक्स सापडले. ट्रकचा चालक फुकराज सिंग याला मुद्देमालासह ताब्यात घेतले असून, महाडमधील दारूबंदी कार्यालय येथे पुढील कारवाईसाठी नेण्यात आले. या कारवाईमध्ये भरारी पथकाचे पोलीस उप निरीक्षक शहाजी गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक संतोष गोंदकर, पोलीस कॉन्स्टेबल अमोल चिलघर, पोलीस कॉन्स्टेबल चौगुले यांचा समावेश आहे. एकीकडे राज्य उत्पादन शुल्क खात्याचे अधिकारी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर गोवा बनावटीचे दारू पकडत असताना महाड तालुक्यात वाईन शॉप मधून कोणताही परवाना नसताना मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर दारू गामा गावात विकण्याचे काम महाड मधील वाईन शॉप धारक करीत आहेत. त्यामुळे महाड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर गावागावात विनापरवाना बार चालू झाले आहेत. मात्र, यावर उत्पादन शुल्क खात्याचे अधिकारी कारवाई करण्याऐवजी त्यांना गोंजारण्याचे काम करीत असल्याने तालुक्यातील नवीन तरुण पिढी दारूच्या आहारी गेल्याचे निष्पन्न होत आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री.आत्माराम द्वारकानाथ गायकवाड रा. घर नं. ४१७, ओवले-पनवेल, रायगड- ४१०२०६ यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मौजे-कुरुंग, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| जमीन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ज्ञानेश्वर बापु हिरे | ३४/२/ब | ०.२८.०० पो.खराबा ०.०४.०० एकूण क्षेत्र ०.३२.०० | ०.५० |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क, मृत्युपत्रांकित दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख :- ०२-११-२०२५

**अ‍ॅड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को.ऑप.हौसिंग सोसायटी
कोतवालनगर कर्जत, जि. रायगड
मो.नं.८४४६१४८७८१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.देवदत्त वामन मुरुडकर मिरची गल्ली, अलिबाग, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| अलिबाग, ता.अलिबाग | ४०८/४०९/२/सी | १०३.६८ चौ.मी. | - |
| अलिबाग, ता.अलिबाग | सर्व्हे नं.१६९/७ | ०-००-८० हे.आर. | ०-५० रु.पैसे |

वर नमुद केलेली मिळत व त्या मिळकतीतील अलिबाग नगरपालिका जुना मालमत्ता क्र. ALB000001079 नवीन Z1MKT001081 घर नं.७९५, सदनिका क्र.१०१ व बिगर निवासी गाळा क्र.१ ही सर्व मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. ०१-१२-२०२५

सही/-
**अ‍ॅड. आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राह्मणआळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि. रायगड

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :-mahad.ee@mahawd.gov.in Ph. No. (०२१४५) २२२१६७
निविदा सूचना क्रमांक ४० सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणी कृतकंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २. | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | गोरेगांव हरकोल गोवेले फाटा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग ८५ कि.मी. ०/०० ते १३/९२० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २३२५७७०/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| २ | ढालगर लोणशी उणेगाव गोरेगांव चिंचवली देवळी रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग ८६ कि.मी. ०/०० ते १४/६०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड.. | ३३८७१३०/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ३ | गोरेगांव वडवली दहिवली मोर्बा रस्ता प्राजिमा ६४ कि.मी. ०/०० ते ८/४०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २३०८४४५/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ४ | होडगांव घरोशी रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग ६२ कि.मी. ४/७०० ते १०/२०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १६०२५४२/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ५ | म्हासडी कोरखंडे किस्तकेतकी निगुडशेत ते राज्य मार्ग ९७ आणि निगुडशेत मेढे ते राज्या मार्ग ९१ रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग ८१ कि.मी. ०/०० ते ४/४००, ९/९०० ते १६/४०० व १७/३०० ते १८/५०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे तालुका तळा, जिल्हा रायगड.. | १२६५९१६/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ६ | खरवली फाटा पेण उसर तळेगांव पन्हेळी रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग ६० कि.मी. ०/०० ते १८/९६० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १६५६४१९/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ७ | हरकोल मांजरवणे ते रा.मा. ९९ कि.मी. ०/००० ते १३/७०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १७८०१६०८/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ८ | पुरार महाप्राळ खेड रस्ता रा.मा. ०/०० ते ११/२०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका माणगांव | १६४२४९४/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| ९ | आंबेत बागमांडला रस्ता रा.मा. १०० कि.मी. २७/०० ते ४५/०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १२२०३५६/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |
| १० | कांदळगांव शिरवली जिते ते जिल्हा हद्द मार्ग ६१ कि.मी. ०/०० ते १०/५०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | १५०४२९२/- | म.स.स. | ५९०/- | ६ महिने | म.स.स. |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदारांच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०३/११/२०२५ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक १०/११/२०२५ वेळ १८.०० वाजेपर्यत |
| २ | ऑनलाईन व्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक १२/११/२०२५ वेळ १०.०० वाजता |

टिपः- परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेत स्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईल निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४५०४
**दिनांक : २८/११/२०२५**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता महाड (सा.बां.) विभाग, महाड**

### ग्रामपंचायत नांदवी

ता. माणगाव-जिल्हा-रायगड
ई-निवीदा सन २०२५-२०२६ (1ST CALL)
ई-निविदा सुचना

ग्रामपंचायत नांदवी, तालुका - माणगाव, जि. रायगड यांचेकडील श्री बाळासाहेब ठाकरे स्मृती अभियान २०२५-२६ अंतर्गत खालील कामाची निविदा योग्य त्या जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage Rate Tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे.
सदर निविदा बाबतची माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थलावर ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर उपलब्ध होईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाची मुदत | आवश्यक कंत्राटदार | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | CONSTRUCTION OF GRAMPANCHAYAT OFFICE BUILDING AT NANDAVI V P NANDAVI TALUKA MANGAON DIST RAIGAD | २०,००,००० | २००००/- | ५९०/- | ६ महिने | रा.जि. प. कडील नोंदणीकृत ठेकेदार | ६ व त्या वरील |

निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे -
१) सदरसंपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निवादा, नोटीस, सुचना, शुध्दीपत्रक इत्यादी माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.
२) वरील कामाची निविदेची http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून खाली दिलेल्या कालावधीत असेल.
३)

| तपशिल | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| संकेत स्थळावरून ई-निविदा प्रसिध्दी कालावधी | ०२/१२/२०२५ | ११:०० | ०८/१२/२०२५ | १७:०० |
| निविदा फॉर्म व परिशिष्ट डाऊनलोड करण्याचा कालावधी | ०२/१२/२०२५ | ११:०० | ०८/१२/२०२५ | १७:०० |
| ई-निविदा सादर करणेचा कालावधी | ०२/१२/२०२५ | ११:०० | ०८/१२/२०२५ | १७:०० |
| ई निविदा उघडणेचा तारीख व वेळ | दिनांक ०९/१२/२०२५- वेळ १७:०० वाजता | | | |

# निवडक

## राहत्या घरातून इसम बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार उरण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सोहम सुशिल शिरढोणकर वय ३० वर्षे, रा. उरण असे या इसमाचे नाव असून, रंग-गोरा, उंची अंदाजे



०६ फुट, चेहरा-गोल, डोळे-काळे, केस-मध्यम (काळे), डोळ्यांवर चष्मा, छातीवर जुनी जखम, अंगात नेसून मेहंदी रंगाचा टी-शर्ट, कॉलर काळ्या रंगाची त्यावर लाल रंगाची लाईन ब्ल्यू रंगाची जिन्स पॅन्ट, पायात सँडल, मराठी व हिंदी भाषा बोलता येते. सोबत एम.आय. कंपनीचा मोबाईल फोन आहे. या इसमाला कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उरण पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## पनवेलमध्ये कारची चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहा समोर उभी करून ठेवलेली काळ्या पिवळ्या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची कार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. विद्या मनोहर यांची २,९५००/- रुपये किमतीची गाडी क्रमांक एम.एच. ४६ बीएफ ४९२१ ही वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर गाडी चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मोटारसायकलची चोरी

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाहेर उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. दीपक जाधव यांनी त्यांची १५,०००/- रुपये किमतीची काळ्या रंगाची हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल क्रमांक एमएच १४ एएल ८३३ ही पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाहेर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## कपड्याच्या दुकानात चोरीचा प्रयत्न




**पनवेल :** पनवेल शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या कपड्याच्या दुकानासह इतर दुकानात चोरीचा प्रयत्न झाल्याची घटना घडली आहे. येथील फेशन वर्ल्ड या दुकानात अज्ञात चोरट्याने चोरी करण्याचा प्रयत्न करत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून येत आहे. त्याचप्रमाणे स्वाती ऑप्टिक्स या दुकानाचेसुद्धा शटर उचकटण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत पनवेल शहर पोलिसाना माहिती देण्यात आली आहे.




## एड्सबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

**माणगाव :** दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून पाळला जातो. जगभर फैलावलेला एड्स या जीवघेण्या रोगाबद्दल जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस पाळावा, असे जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केले आहे.त्यानिमित्त रेड रिबन क्लब व माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजिवन अध्ययन आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती करण्यासाठी सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी विविध तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व्याख्याने, पथनाट्य, पोस्टर मेकींगचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे व डॉ. बी.एम. खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमासाठी आजिवन अध्ययन आणि विस्तार विभाग विभागप्रमुख प्रा. मेहरीन डावरे व राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. नेहा तुराई, प्रा. डॉ. जे.आर. पाण्डेय, प्रा. स्वप्नील सकपाळ, प्रा. विशाखा पवार, प्रा. श्वेता सकपाळ, प्रा. श्रावणी बक्कम, प्रा. पंकज गायकवाड आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदानासाठी प्रशासन सज्ज

**|| कर्मचारी मतदान केंद्रांकडे रवाना || रात्री दहा वाजता थंडावल्या प्रचाराच्या तोफा**

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड जंजिरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. प्रभाग १० मधून २० नगरसेवकांसाठी ५८ तर थेट नगराध्यक्षासाठी ३ उमेदवार रिंगणात असून, या निवडणुकीकरिता एकूण ११,५४४ मतदार असणार यामध्ये पुरुष ५४४०, स्त्री ६१०४ मतदान करणार आहेत. मुरूड प्रशासनाकडून मतदानाची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. मतदानासाठी नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी १७ ईव्हीएम व मतदान साहित्यासह मतदान केंद्रांकडे रवाना झाल्या आहेत.





नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने गेल्या पंधरवड्यापासून तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. सोमवारी रात्री दहा वाजता जाहीर प्रचार संपुष्टात येणार आहे. नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या मराठी शाळेतील १७ मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी प्रशासनाने अधिकारी, कर्मचाऱ्यांची व पोलीस असे एकूण १५४ यांची नियुक्ती केली आहे. प्रत्येक केंद्रावर पाच कर्मचारी, एक पोलीस व एक होमगार्ड नियुक्त करण्यात आला आहे. तसेच मतदान केंद्राच्या बाहेरदेखील पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यामध्ये मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी १, २ व ३ तसेच शिपाई असेल. पथकासोबत एक पोलीस कर्मचारीही असेल. शहरातील मतदान प्रक्रिया शांततेत व निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी नगरपरिषद, महसूल यंत्रणा व पोलीस विभाग सतर्क आहे. प्रशासनाने मतदान दृष्टीने तयारी पूर्ण केली आहे.


● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

पोलीस प्रशासनाकडून ६० पोलीस, ३४ होमगार्ड व ८ अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी दिली.

# निवडणुकीच्या कामात ई-रिक्षा, रुग्णवाहिका दिमतीला



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील माथेरान गिरीस्थान नगरपरिषद निवडणुकीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. या निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार असून, सर्व दहा मतदान केंद्रांवर मतदान साहित्य पोहोचले आहे. दरम्यान, माथेरानमध्ये पर्यावरण पुरक इ रिक्षा आणि रुग्णवाहिका यांचा वापर मतदान साहित्य आणि मतदान केंद्रातील अधिकारी कर्मचारी यांना पाठवण्यासाठी करण्यात आला.

माथेरान नगरपरिषदेसाठी ४०५५ मतदार असून, उद्या दोन डिसेंबर रोजी दहा मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. यासाठी सोमवारी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात मतदान केंद्र अधिकारी, कर्मचारी यांना मतदान साहित्य देण्यात आले. माथेरान पालिका निवडणुकीत दहा प्रभाग असून, या दहा प्रभागांतील मतदारांसाठी दहा ठिकाणी मतदान केंद्रे बनविण्यात आली आहेत.

मतदान केंद्रांसाठी ६६ कर्मचारी तैनात करण्यात आले असून, त्यात मतदान केंद्राध्यक्ष तसेच मतदान केंद्रातील तीन कर्मचारी आणि एक शिपाई तसेच कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचवेळी तीन प्रभागांसाठी लागणारे कर्मचारी हे राखीव ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र ठाकूर यांनी दिली. मतदान केंद्र साहित्य वाटपप्रसंगी सहनिवडणूक निर्णय अधिकारी पालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे, निवडणूक नायब तहसीलदार गोविंद कोटुंबे हे उपस्थित होते. यावेळी माथेरान नगरपरिषद निवडणुकीसाठी पहिल्यांदा पर्यावरणपूरक ई-रिक्षा यांचा वापर मतदान साहित्य यांची ने-आण करण्यासाठी करण्यात आली.

# १२,६३७ मतदार बजावणार हक्क

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण दहा प्रभागांतून २० नगरसेवक व एक नगराध्यक्ष निवडण्यासाठी निवडणूक होणार आहे. निवडणुकीसाठी प्रशासनाकडून तयारी झाली असून, प्राप्त माहितीनुसार निवडणुकीसाठी शहरात एकूण २० मतदान केंद्रे राहणार असून, एकूण मतदारसंख्या १२६३७ आहे. त्यामध्ये पुरुष मतदारांची ६२०२ असून, स्त्री मतदारांची संख्या ६४३५ आहे. मतदानासाठी ईव्हीएम मशीन्स वापरण्यात येणार आहेत.

मतमोजणीचे दिवशी म्हणजे ३ डिसेंबर रोजी होणार आहे. मतमोजणीसाठी १० टेबले मांडण्यात येणार असून, दोन फेऱ्यांमध्ये मतमोजणी पूर्ण होईल. निवडणुकीच्या कामासाठी अंदाजे २५० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तहसीलदार महेंद्र वाकलेकर हे निवडणूक निर्णय अधिकारी असून, जीवन पाटील व मनोज माने सहा.निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# भाजपच्या भुजबळांची सत्ता खालसा

**रत्नदीप पाटलांचा दणदणीत विजय**



**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल वकील बार असोसिएशनच्या त्रैवार्षिक निवडणुकीमध्ये चौकार मारण्याच्या तयारीत असलेले पनवेल महानगरपालिकेचे भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक आणि बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांची सत्ता खालसा करत ॲड. रत्नदीप पाटील यांनी विजय संपादित केला.

या निवडणुकीत विजय प्राप्त केल्यानंतर ॲड. रत्नदीप पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात जाऊन माजी आमदार बाळाराम पाटील यांची सदिच्छा भेट घेतली आणि पुढील वाटचालीस आशीर्वाद घेतले.

पनवेल वकील बार असोसिएशनची निवडणूक कोणाच्याही दबावाला बळी न पडता रत्नदीप पाटील यांनी खूप गंभीरपणे घेतली. सरकारी वकील वाय.एस. भोपी यांनी नैतिकतेचा आरसा आणि सत्यमेव जयतेचा निनाद करून ॲड. प्रफुल्ल म्हात्रे, ॲड. गजानन पाटील, ॲड. जी.आर. कडव, ॲड. डी.एन. गोंधळी यांनी मेहनत घेतल्यामुळे ॲड. रत्नदीप पाटील यांच्याकडे विजयाचे पारडे झुकले.

नुकत्याच पार पडलेल्या पनवेल न्यायालयातील वकील बार असोसिएशनच्या निवडणुकीमध्ये पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी विशेष लक्ष घालून ॲड. मनोज भुजबळ यांना पुन्हा अध्यक्षपदी निवडून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. निवडणुकीच्या तोंडावर अधिवक्ता परिषदेचे आयोजन करून राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांना बोलावून निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. तसेच पनवेलमधील वकिलांना स्वतः फोन करून त्यांच्यावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला. राजकारणापासून नेहमीच दूर राहिलेले रत्नदीप पाटील यांना हलक्यात घेणे मनोज भुजबळ यांना खूप महागात पडले, तसेच येथे ईव्हीएमची जादू चालत नसल्याने त्यांचे काही चालले नाही. या निवडणुकीच्या निकालानंतर पनवेलमध्ये येऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती आणि महानगरपालिका निवडणुकीमध्येसुद्धा असेच चित्र दिसेल, अशी चर्चा नागरिक करताना दिसत आहेत.

या निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. एच.जे. शेळके यांनी सक्षमपणे काम करत असताना त्यांना ॲड. राजेश पाटील, ॲड. जगदीश म्हात्रे, ॲड. कुंभार आदी वकिलांची साथ मिळाली. शेळके यांनी या निवडणुकीमध्ये कणखर भूमिका बजावत चार टेंडर वोटिंग मतमोजणी घेण्यास नकार दिला. त्यांनी बोगस दाखला प्रकरणात अटकेत असलेले ॲड. नितीन केळकर यांना निवडणुकीच्या मतदानापासून अटकाव केला. यावेळी त्यांनी सांगितले की, यांना मतदान करण्यासाठी न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, यामुळे ॲड. नितीन केळकर यांना मतदान करता आले नाही आणि भुजबळ आणि कंपोजच्या मेहनतीवर पाणी फिरले गेले.

ॲड. रत्नदीप पाटील यांच्या समूहाने निवडणुकीच्या दिवशी न्यायालय परिसरात दक्ष राहून परप्रांतीय वकील, कर्जत, नवी मुंबई, ठाणे आणि उरण वकील बार असोसिएशन निवडणुकीत दोन वर्षांच्या आत मतदान केलेल्या आणि येथे दुबार मतदार करून पाहणाऱ्या वकिलांना अटकाव केला. यामुळेच रत्नागिरी पाटील यांचा विजयरथ २८ मतांची आघाडी घेऊ शकला. याचाच अर्थ असा की, ही निवडणूक धनदौलतीने जिंकता येत नाही, हे स्पष्ट दिसून आले.

# जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती

**| रसायनी | प्रतिनिधी |**

१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त श्री समर्थ सामाजिक संस्थे अंतर्गत जनजागृती कार्यक्रम रसायनी पाताळगंगा परिसरात पार पडले. यानिमित्ताने विद्यार्थी पदरॅली व परिसरातील शाळांमधील इयत्ता ८ वी ते १२ वीमधील किशोरवयीन विद्यार्थ्यांना व्याख्यानामार्फत एड्स आजाराबद्दल महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.



दरवर्षी परिसरातील गावांत पथनाट्य या माध्यममाद्वारे जागृती करण्यात आली. पथनाट्यातून जास्तीत जास्त किशोरवयीन मुलांना जागृत करण्याचा संस्थेचा मानस आहे.

आज डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय वाशिवली येथील जूनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची पदरॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांना एड्सबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांनी किशोरवयीन होणारे शारीरिक, मानसिक बदल यावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून एड्स आजाराबद्दलची संपूर्ण माहिती देऊन त्यांच्या मनातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला.

जागतिक एड्स दिनाच्या या कार्यक्रमास प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथील मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. मंगेश देशमुख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर बिर्ला कार्बन इंडिया कंपनीचे अधिकारी हरीश रावत, लक्ष्मण मोरे, डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय येथील प्राचार्य डॉ. अनिल पाटील, सर्व शिक्षक वर्ग, श्री समर्थ संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील, काशिनाथ खुडे, स्वप्नील घरत आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमास बिर्ला कार्बन इंडिया लिमिटेड यांचे सहकार्य मिळाल्याचे अरविंद पाटील यांनी सांगितले.

# बडोदा बँकेत चेकच्या रकमेमध्ये हेराफेरी

**| पेण | प्रतिनिधी |**

विंग्स नेटवर्स सर्व्हिसचे मालक अविनाश पांडुरंग पाटील यांच्या नावे धनादेश क्रमांक ००३०६ हा बाराशे रुपयांचा गर्जा रायगड या खात्याचा चेक दिला होता. मात्र, बँकेने या बाराशे रुपयांच्या चेकच्या बदल्यात नऊ हजार दोनशे रुपये गर्जा रायगडच्या खात्यावरुन कट करुन अविनाश पांडुरंग पाटील यांच्या खात्यावर जमा केले. याचा मेसेज जेव्हा गर्जा रायगडचे संपादक संतोष पाटील यांना आला, दुसऱ्या दिवशी विचारायला गेल्यावर कर्मचाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

मात्र, बँकेच्या शाखाप्रमुखांनी सोमवारपर्यंत कट झालेले पैसे जमा होतील, असे सांगितले होते; परंतु सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी




शाखा प्रमुखांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, चेक क्लेअरीकर विभागाला मेसेज टाकला आहे. बुधवारपर्यंत रक्कम आपल्या खात्यामध्ये जमा होईल. असे असले तरी बँक हलगर्जीपणा कशी करु शकते, चेक बाराशे रुपयांचा आणि त्याबदल्यात नऊ हजार दोनशे रुपये गर्जा रायगडच्या खात्यातून डेबीट करते याचा अर्थ बँक कर्मचारी हे बेजबाबदार आहेत, असेच म्हणावे लागेल. तरी, या कर्मचाऱ्यांविरुद्ध कठोर पावले वरिष्ठांनी उचलावी, अशी मागणी करण्यात येणार आहे.

# दिव्यांगांसाठी सुवर्णसंधी

**| रसायनी | प्रतिनिधी |**

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जनशिक्षण संस्थान रायगड व शुभ्रा प्रकल्प आयोजित जागर युनिफाइड संकल्पनेचा अंतर्गत संस्थापक भाग्यश्री वर्तक यांच्या पुढाकाराने दि. १ व २ डिसेंबर या दोन दिवसीय 'फळ व भाज्या प्रक्रिया' कार्यशाळेचे उद्घाटन दि. १ डिसेंबर रोजी गुरुकुल सेंटर फॉर स्पेशल चिल्ड्रेन येथे डॉ. मेधा सोमैया यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी फळ व भाज्या प्रक्रियेच्या माध्यमातून विशेष दिव्यांग जनजागृती व रोजगाराच्या सुवर्णसंधी निर्माण होतील, असे मत संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया यांनी व्यक्त केले. तर, व्होकल फॉर लोकलसाठी अशा प्रशिक्षणाची गरज असल्याचे मत संचालक डॉ. विजय कोकणे यांनी व्यक्त केले.

**अभिनव ज्ञानमंदिर विद्यालयाचा उपक्रम | विद्यार्थ्यांच्या कामाचे सर्व स्तरातून कौतुक**

# श्रमधानातून बांधला वनराई बंधारा

**| माणगाव | प्रतिनिधी |**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित अभिनव ज्ञानमंदिर, उसर खुर्द विद्यालयामार्फत शनिवार, दि. २९ नोव्हेंबर रोजी उसर खुर्दच्या नदीवर वनराई बंधारा बांधण्याचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या बंधाऱ्यामुळे पशुपक्ष्यांच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

या बंधाऱ्याचे उद्घाटन उसर गावचे माजी अध्यक्ष पांडुरंग कदम यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. कार्यक्रमाला शहाजी जगताप, दिलीप घाग तसेच माजी विद्यार्थी आशिष घाग (पाणी समिती सेक्रेटरी), गणेश सावंत, साक्षी विचारे, समीर घाग हे मान्यवर उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायतीचे कर्मचारी आणि माजी विद्यार्थी



सौरभ शिंदे यांनी ग्रामसेवक प्रचित माशाळ यांच्या सहकार्याने बंधारा बांधण्यासाठी लागणाऱ्या सिमेंटच्या पिशव्यांची व्यवस्था केली.

कार्यक्रमात विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी सिमेंटच्या पिशव्यांत माती भरून मोठ्या श्रमांनी बंधारा उभारला. संविधान दिनानिमित्त मुलांना श्रमाचे महत्त्व समजावे, तसेच पर्यावरण-जतनाची जाणीव निर्माण व्हावी या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांनी सांगितले. वनराई बंधाऱ्यामुळे निर्माण झालेले पाणी पंचक्रोशीतील सहा गावांतील गुरांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. तसेच बंधाऱ्यालगत असलेल्या विहिरीतील पाण्याचीही पातळी वाढते. गेली २५ वर्षे उसर हायस्कूल विविध ठिकाणी बंधारे बांधून सामाजिक कार्याचा वसा जपत आहे.

या उपक्रमाबद्दल संस्थेचे सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शालेय समिती अध्यक्ष किशोर अल्हाट, सदस्य विजयराव सावंत, कोषाध्यक्ष विश्वास सोनवणे, तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी यांनी समाधान व्यक्त करून पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

हा बंधारा यशस्वी करण्यासाठी शिक्षक विनोद लाड, कालगुडे, विद्या शिर्के, गावित यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी ग्रामपंचायत उसर खुर्द तर्फे ग्रामसेवक प्रचित माशाळ यांनी सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन उपक्रमाची सांगता करण्यात आली.

# ४५ जणांनी केले रक्तदान



**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

ज्येष्ठ समाजसेवक, उद्योजक, दानशूर व्यक्तिमत्त्व मारुती गणपत पडवळ यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त श्री वरदायिनी क्रीडा मंडळ राबगाव यांच्यातर्फे सलग नवव्या वर्षाच्या रक्तदान शिबिराचे राबगाव येथे आयोजन करण्यात आले होते. याकामी जिल्हा शासकीय रुग्णालय अलिबाग यांचे व डॉ. दीपक गोसावी व टीमचे सहकार्य लाभले. यावेळी ४५ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

समाजसेवक मारुती शेठ पडवळ यांचे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व सेवाभावी कार्य उत्तुंग व उल्लेखनीय आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी वरदायिनी क्रीडा मंडळ राबगाव यांच्या पुढाकाराने रक्तदान शिबीर आयोजित केले जाते. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून विज्ञान तंत्रज्ञानाने अवकाशाला गवसणी घालणारी नेत्रदीपक प्रगती केली असली आजवर मानवी रक्ताला पर्याय आलेला नाही, या जाणिवेतून सर्वांनी दिलेले रक्त अनेकांचे प्राण वाचवू शकते या भावनेतून होणाऱ्या या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला.

# आयोगाचा गोंधळात गोंधळ

रायगडातील सर्व नगरपालिकांसह राज्यात बहुतांश ठिकाणी आज मंगळवारी मतदान होणार आहे. मात्र प्रचार संपायला जेमतेम ४८ तास बाकी असताना शनिवारी रात्री उशिरा अचानकपणे बारामतीसह दहा नगरपालिकांच्या व इतर ठिकाणच्या काही प्रभागांच्या निवडणुकापुढे ढकलण्यात आल्या. आता त्या वीस डिसेंबरला होतील. बारामती, कोपरगाव, महाबळेश्वर, अंबरनाथ इत्यादी ठिकाणी नगराध्यक्षपदाबाबतच वाद असल्याने पूर्ण निवडणूक स्थगित केली गेली आहे. इतरत्र काही प्रभागांपुरता हा बदल होईल. यापैकी अनेक ठिकाणी उमेदवारी अर्ज छाननी योग्य रीतीने झाली नाही असा आक्षेप घेऊन न्यायालयात खटले दाखल होते. त्यावर सुनावणी चालू होती किंवा काही ठिकाणी तर सुरुही झाली नव्हती. स्थानिक निवडणूक अधिकाऱ्यांनी या खटल्यांकडे दुर्लक्ष करून संबंधित उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करून टाकले. ते बेकायदा होते. पुढे जाऊन या सगळ्यांना आक्षेप घेतला जाणार व आयोगावर ताशेरे ओढले जाणार हे लक्षात येताच राज्य निवडणूक अधिकाऱ्यांनी अखेरच्या क्षणी या ठिकाणची प्रक्रिया पुढे ढकलली. आता वीस डिसेंबरला तेथील नवीन चिन्हांसह मतदान होईल. हा सर्व घोळ आधीच टाळता आला असता. पण निवडणूक आयोग म्हणजे जागोजागी गोंधळ असेच समीकरण सध्या बनले आहे. राज्यातील जिल्हा परिषदा व महापालिकांच्या निवडणुकांचाही घोळ पूर्णपणे मिटलेला नाही. त्या ठरल्या वेळीच घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिले असले तरी त्यांच्यावरची टांगती तलवार कायम आहे.यापैकी अनेक ठिकाणचे आरक्षण ५० टक्क्यांच्या वर गेल्याचे आक्षेप आहेत. मधल्या काळात ओबीसींचे आरक्षणाबाबतचे खटले सर्वोच्च न्यायालयात चालूच राहतील. तेथे जो निकाल येईल तो या निवडणुकांच्या निकालांना बंधनकारक राहील. म्हणजे आता निवडून आले तरी सर्वोच्च न्यायालय ही निवडणूक बेकायदाही ठरवू शकते. अशा स्थितीत मुळा इतक्या घाईने निवडणुका रेटण्याची गरज काय आहे असा प्रश्न कोणालाही पडावा. ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्याचा मुद्दा या सर्वांच्या मुळाशी आहे.

### आरक्षण – एकदाच निकाल द्या

आदिवासी वा दलितांच्या संख्या जिथे अधिक आहे तेथे २७ टक्के ओबीसी आरक्षणामुळे एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या वर जाते आहे. यातून हा तिढा निर्माण होतो आहे. ५० टक्क्यांची मर्यादा वाढवणे हाच त्यावरचा एकमेव मार्ग आहे व तो केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण देशभर मान्य होईल असा आहे. शिवाय हा केवळ राजकीय आरक्षणाचा सवाल नसून नोकऱ्या व शैक्षणिक राखीव जागांमध्येही हा प्रश्न पुन्हा पुन्हा चर्चेत येत असतो. मराठा आरक्षणाचा प्रश्न लटकण्याचे तेही एक कारण आहे. अशा स्थितीत न्यायालयांनीही या मुद्द्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन लागोपाठ सुनावणी घेऊन हा विषय संपवायला हवा. जेणेकरून सातत्याने होणारी आंदोलने व निवडणुका पुढे ढकलण्यासारखे प्रसंग येणार नाहीत. अर्थात, निवडणूक आयोगाचे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील सध्याचे वर्तन पाहता त्यांना आपल्यावरच्या टीकेची काही पर्वा आहे असे वाटत नाही. सध्या उत्तर प्रदेश, गुजरात, बंगाल, तमिळनाडू इत्यादी राज्यांमध्ये मतदारयाद्यांच्या कडक तपासणीची मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये बऱ्याच भानगडी असल्याच्या तक्रारी रोज येत आहेत. आसाममध्ये या तपासणीची सर्वाधिक गरज होती. कारण तेथे बांगलादेशातून येणाऱ्या परकी नागरिकांच्या प्रश्नावर गेली ५० वर्षे आंदोलने चालू आहेत. पण या राज्यात वरवरची पाहणी करून विषय संपवण्यात आला आहे. बहुदा तेथे भाजपचे राज्य असल्यामुळे तसे झाले असावे. दुसरीकडे बंगालमध्ये मात्र फारच कठोर निकष लावले जात आहेत. त्यातून रोज काही ना काही वाद निर्माण होत आहेत. हे राज्य बांगलादेशाच्या सीमेवर आहे. पलिकडून येणारा ओघ मोठा आहे. यात पेच असा आहे की, अनेकांकडे आधार कार्डे ही आहेत. सर्वोच्च न्यायालयाने बिहारमधील तपासणी करताना आधार ग्राह्य मानावे असे सांगितले होते. पण आता बंगालमध्ये त्यावरूनच संघर्ष सुरू आहेत. न्यायालयेही काही वेळेला याबाबत उलटसुलट मतप्रदर्शन करीत असतात. आधार हा ओळखपत्राचा पुरावा नाही हा न्यायालयाचा खूप पूर्वीचा निर्णय होता. पण बिहारमधील मतदारांची ससेहोलपट लक्षात घेऊन आधारला पुरावा मानण्यास परवानगी देण्यात आली. नव्हे निवडणूक आयोगाला तशी तंबी देण्यात आली.

### मतदारयादी तपासणीतील मृत्यू

आता पुन्हा आधारला निर्विवाद पुरावा कसा मानता येईल असा सवाल नवे सरन्यायाधीस सूर्यकांत यांनी केला. बांगलादेशातून येथे येणाऱ्यांना नागरिकत्वाचे अधिकार कसे देणार अशी त्यांची विचारणा होती. ती निवडणूक आयोग व भाजपच्या विद्यमान सरकारला अनुकूल अशी आहे. यामुळे मतदारयादी तपासणीच्या नावाने जे काही चालू आहे त्या सगळ्याला जणू न्यायालयाची मान्यता आहे असा संदेश जाण्याचा धोका निर्माण होतो. किंवा, भाजपच्या प्रचारयंत्रणेमार्फत तसा समज पसरवला जाऊ शकतो. मतदार तपासणी चालू असलेल्या सर्व राज्यांमधून तळाच्या कर्मचाऱ्यांकडून निवडणूक आयोगाच्या कामाच्या जबरदस्तीबाबत अनेक तक्रारी आहेत. आयोगाकडे स्वतःचे असे मनुष्यबळ नसल्याने सर्व ठिकाणी स्थानिक पातळीवरचे शिक्षक, अंगणवाडी कर्मचारी वा इतर खात्यांमधील कर्मचाऱ्यांना ही इलेक्शन ड्यूटी म्हणून कामाला लावण्यात आले आहे. प्रत्येकाला एका महिन्याच्या आत एक हजार मतदारांची ओळख पटवून त्यांचे अर्ज दाखल करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. घरोघरी जाऊन आधी हे अर्ज वाटावे लागतात, नंतर प्रत्येक मतदाराची ओळख पटवून त्याचा फॉर्म भरावा लागतो. त्यात काहीही चुका राहिल्या तर दंड किंवा पोलिसी कारवाईचे भय असते. मतदारांची ओळख पटवताना त्यांच्या नातेवाईकांची नावे पूर्वीच्या यादीत आहेत का, तसेच त्याने सादर केलेले जन्मतारखांचे वगैरे पुरावे योग्य आहेत का याची खातरजमा करावी लागते. यामध्ये काहीही गफलत राहिल्यास कोर्टाचे खटले होऊ शकतात. त्यामुळे या स्थानिक कर्मचाऱ्यांवर कमालीचे दडपण आले असून अनेक राज्यांमधून या कामाच्या ताणामुळे मृत्यू झाल्याच्या बातम्या आहेत. काही ठिकाणी तर कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या असून या कामामुळेच आपण मृत्यूला कवटाळत असल्याची चिठ्ठी लिहून ठेवली आहे. अगदी उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात या भाजपशासित राज्यांमध्येही अशा आत्महत्या घडल्या आहेत. यातील विदारक बाब अशी की, बाकी सर्व विरोधी पक्षांनी या मतदार तपासणीच्या बुलडोझरसारख्या रेट्याला आक्षेप घेतलेला असताना भाजपने मात्र त्याचे कायम स्वागतच केले आहे. किंबहुना, निवडणूक आयोगावर याबाबत काहीही टीका झाली तरी त्याचा बचाव करण्यासाठी भाजपचे नेतेच पुढे येत असल्याचे चित्र आहे. राजकीय पक्ष, सरकारी कर्मचारी इत्यादींना विचारात न घेता, पुरेसे प्रशिक्षण न देताच आयोगाने जबरदस्तीने ही तपासणी पुढे रेटली आहे. यातून आयोगाची अधिकाधिक बदनामी होत असून यात काही कारस्थान आहे की काय असा संशय येतो आहे. आयोगाने आता तरी हे सर्व गोंधळ ताबडतोब थांबवावेत व पुढे येऊन पारदर्शकपणे माहिती द्यावी.

विचार

# वनस्पती आणि संगीताचे अनोखे भावविश्व

***वनस्पतींच्या वाढीवर प्रकाश, पाणी, तापमान यासारख्या भौतिक बाबींसोबतच ध्वनीलहरींचाही परिणाम होतो. म्हणूनच वनस्पती आणि संगीताच्या परस्परसंबंधांचा अभ्यास अनेकांना आकर्षक वाटतो. वनस्पतींमध्ये चेतासंस्था नसली तरी त्या सभोवतालच्या परिस्थितीला प्रत्युत्तर देतात. सूर्यप्रकाशाकडे झुकणे, पाण्याच्या दिशेने मुळे वाढवणे, स्पर्शाने पाने आकुंचन पावणे या काही उदाहरणांवरून वनस्पतींची संवेदनाक्षमता लक्षात येते.***



डॉ. दीपक शिकारपूर

‘वृक्षवल्ली आम्हा सोयरी’ हा ज्ञानोबा माउलींचा विचार. सर जगदीशचंद्र बोस यांचा ठाम विश्वास होता की वनस्पतींमध्ये संवेदनशील मज्जासंस्था असते, ती प्राण्यांपेक्षा वेगळी नाही तसेच बाह्य उत्तेजनांवरील त्यांच्या प्रतिक्रिया मोजल्या जाऊ शकतात आणि त्या रेकॉर्ड केल्या जाऊ शकतात. जगातील प्रत्येक गोष्ट काही ना काही आवृत्तीच्या कंपाने बनलेली आहे. हिंदु तत्त्वज्ञानात ‘ॐ’ हा नाद सृष्टीचा मूलाधार मानला जातो. वनस्पती, प्राणी, मानव, पाणी, हवा सर्व एकाच नादात्मक ऊर्जेच्या स्वरूपातून निर्माण झाले आहेत. संगीत वातावरणात गुंजते, तेव्हा ही ऊर्जा जिवंत पदार्थाशी जोडली जाते. म्हणूनच संगीत वनस्पतींना ‘जिवंत’ वाटते; त्यातून परस्परसंवाद निर्माण होतो. मानवप्राण्याप्रमाणे वनस्पतींनाही आपल्या आयुष्यात अनेक सूक्ष्म संवेदना अनुभवता येतात, हे वैज्ञानिक संशोधनातून स्पष्ट झाले आहे. प्रकाश, पाणी, तापमान, वायू यासारख्या भौतिक गोष्टींसोबतच ध्वनीलहरींचाही वनस्पतींच्या वाढीवर आणि विकासावर परिणाम होतो. ध्वनी म्हणजे कंपन; आणि कंपन हा निसर्गाचा मूलभूत घटक आहे. संगीत हे अशा सुव्यवस्थित ध्वनीकंपनांचे सूक्ष्म रूप आहे. म्हणूनच ‘वनस्पती आणि संगीत यांचा परस्पर संबंध’ हा अभ्यास अनेकांना आकर्षक वाटतो. जगतातील प्रत्येक सजीव घटक काही ना काही प्रमाणात वातावरणातील कंपने अनुभवत असतो. वनस्पतींमध्ये चेतासंस्था नसली तरी त्या सभोवतालच्या परिस्थितीला प्रत्युत्तर देतात. सूर्यप्रकाशाकडे झुकणे, पाण्याच्या दिशेने मुळे वाढवणे, स्पर्शाने पाने आकुंचन पावणे ही याची काही उदाहरणे. यावरून वनस्पतींची संवेदनाक्षमता लक्षात येते.

ध्वनीलहरी हाही एक पर्यावरणीय घटक असल्यामुळे संगीतामुळे वनस्पतींच्या वाढीवर परिणाम होतो का, याविषयी अनेक प्रयोग झाले असून त्यातून रोचक निष्कर्ष समोर आले आहेत. ध्वनी हा कंपनांद्वारे प्रसारित होणारा ऊर्जा-स्वरूप आहे. संगीत वाजते तेव्हा हवेमध्ये सूक्ष्म कंपने निर्माण होतात. काही संशोधकांच्या मते हे कंपन वनस्पतींच्या पेशींच्या भिंतींवर परिणाम करतात. कंपनांमुळे पेशींची उत्तेजना वाढते. ध्वनीलहरींमुळे वनस्पतींच्या पेशींमध्ये सूक्ष्म हालचाली निर्माण होतात. त्यामुळे वाढीसाठी आवश्यक असलेल्या एंझाइम्सची कार्यक्षमता वाढू शकते. यामुळे फोटोसिंथेसिस प्रक्रिया सुधारू शकते. काही प्रयोगांमध्ये संगीत सुरु असताना क्लोरोफिलचे प्रमाण अधिक वाढल्याचे निरीक्षण आढळले आहे. यातून ऑक्सिन आणि गिबरेलिनसारख्या वनस्पती हार्मोन्सच्या क्रियाशीलतेत फरक पडतो. त्यामुळे मुळांची आणि खोडांची वाढ बदलू शकते. वनस्पतींवर विभिन्न प्रकारच्या संगीताचा परिणाम होतो. संगीत अनेक प्रकारचे असते. शास्त्रीय, लोकसंगीत, रॉक, पॉप, वाद्यसंगीत इत्यादी. आश्चर्याची गोष्ट म्हणजे वनस्पती प्रत्येक प्रकारच्या संगीताला समान प्रतिसाद देत नाहीत. अनेक प्रयोगांमध्ये आढळले की शांत, सुरेल आणि नादमय संगीतामुळे वनस्पतींची तुलनेने चांगली वाढ होते. स्वरांच्या मृदू कंपनांमुळे पेशींची रचना स्थिर राहते आणि सकारात्मक वाढ होते. रॉक किंवा मोठ्या आवाजातील तालवाद्यांचे संगीत वनस्पतींना ताण देऊ शकते. अशा कंपनांची तीव्रता जास्त असल्याने मुळांची वाढ मंदावणे, पानांची सुकणारी स्थिती किंवा नाजूक वनस्पतींची हानीही दिसून आली आहे.

दरम्यान, पाण्याचा आवाज, वारा हे ध्वनी वनस्पतींसाठी तुलनेने नैसर्गिक असतात आणि त्यांचा परिणाम सौम्य आणि संतुलित असतो, असे लक्षात आले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये नादाचा, विशेषतः ‘नादब्रह्म’ या संकल्पनेचा महत्त्वपूर्ण विचार आहे. वेदांमध्ये, पुराणांमध्ये आणि आयुर्वेदात निसर्गाशी एकरूप होण्याचा उल्लेख आढळतो. अनेक शेतकरी आपल्या शेतात सकाळच्या वेळेस भजन किंवा शास्त्रीय संगीत लावतात. त्याचा वैज्ञानिक पुरावा मर्यादित असला तरी अनुभवजन्यदृष्ट्या त्यांना उत्पादनात सकारात्मक बदल आढळल्याचे अनेकदा ऐकायला मिळाले जाते. माणसांप्रमाणेच वनस्पतीही पर्यावरणाला प्रतिसाद देतात. आपण त्यांना सुखदायक संगीत ऐकवल्यास आश्चर्यकारक परिणाम मिळवू शकतो. त्यातून पानांची, फुलांची संख्या वाढते. फुलांची वेळ लवकर येते (किमान एक आठवडा). बिया लवकर फुटतात. हे थोतांड नसून त्यावर अनेक देशांमध्ये दीर्घ संशोधन (विकसितही) झाले आहे. या विषयावरील शोधनिबंध सर्वत्र उपलब्ध आहेत. वनस्पतींना शास्त्रीय संगीत, स्तोत्रे, बासरी, वैदिक चँट्स आवडतात पण कानठळ्या बसवणारे रॉक संगीत आवडत नाही, हे ही शोधनिबंधामध्ये नमूद केले आहे. ऐकायला मधुर वाटणाऱ्या शांत ध्वनीमुळे मनाची एकाग्रता आणि प्रसन्नता वाढते, मधुर संगीत श्रवणामुळे गायी जास्त दूध देतात. पक्षी, प्राणी यांची उत्पादनक्षमता वाढते. कुक्कुटपालन केंद्रांमध्ये अंड्यांचे उत्पादन वाढल्याचेही प्रयोगात आढळले आहे. मधुर ध्वनी-संगीतामुळे वनस्पती आणि पिकांची वाढ चांगली होते. डॉल्फीन या सागरी माशांना (बहामा बेटाजवळ) संगीत आवडते. गुरांना पाणी पाजताना शीळ घालतात. गुरांची तहान समाधानाने शांत होते.

वृक्षामध्ये प्राण असतो, त्यांना भावना असतात आणि ते मुके जीव नसून ध्वनीही निर्माण करतात, अशी ठाम धारणा असणारे अनेक निसर्गप्रेमी आहेत. त्यातले काही अनुभवी शास्त्रज्ञही आहेत. १९७० मध्ये पीटर टॉम्पकिन्स आणि क्रिस्टोफर बर्ड यांच्या ‘द सीक्रेट लाइफ ऑफ प्लांट्स’ या पुस्तकाने न्यूयॉर्क टाइम्सच्या बेस्टसेलर यादीत स्थान मिळवले होते. या जोडगोळीने या विषयावर सुमारे पन्नास वर्षांपूर्वी सखोल अभ्यास केला होता. वनस्पती संगीताचा मानवाच्या आरोग्यावर होणारा विशेष प्रभाव पाहून अनेक डॉक्टर आनंदाने आश्चर्यचकित झाले. प्रभातफेरी वृक्षवल्लीच्या सहवासात केल्यास मन प्रसन्न होते, याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. शास्त्रज्ञांना आढळून आले की वनस्पती विद्युत आवेग आणि कंपने निर्माण करू शकतात. उदाहरणार्थ, पान त्याच्या पृष्ठभागावर विद्युत प्रभार गोळा करू शकते आणि ते वनस्पतीच्या आतील उतींमधून प्रवाहित करु शकते. वनस्पतीच्या उती नंतर ते वनस्पतीच्या इतर भागांमध्ये प्रसारित करतात. तुम्ही रोपाच्या खोडाला प्लग जोडून त्याची शक्ती मोजू शकता. प्लॅन्टव्हेव हा उद्योग या क्षेत्रात भरीव कार्य करत आहे. त्याने अनेक उपकरणे विकसित केली आहेत, जी तुम्हाला वनस्पतींच्या संगीताचा आस्वाद देते. ‘प्लँटवेव्ह’ नावाचे उपकरण तुम्हाला निसर्गाशी अक्षरशः संपर्क साधू देते. ते तुम्हाला झाडे, फुले, बोन्सायपासून मशरूमपर्यंत वनस्पतींनी निर्माण केलेले आवाज ऐकू देतात. हे उपकरण पानांवर दोन इलेक्ट्रोड लावून वनस्पतींमधील विद्युतीय फरक ओळखू शकते. ही तफावत नंतर लाटांच्या रूपात रेखाटली जाते. तयार झालेले उत्पादन म्हणजे आनंददायी संगीताचा अखंड प्रवाह. जीन थोबी या ख्यातनाम निसर्गप्रेमी संगीत अभ्यासकाने आपले अनुभव व्यावहारिक संगीत थेरपीमध्ये रूपांतरित करण्यास सुरुवात केली. त्याने युरोपमध्ये अनेक ठिकाणी वनस्पती संगीताच्या मैफिलीही आयोजित केल्या. समान वनस्पतीच्या टोनची पहिली मालिका नेहमी सारखीच असते. फक्त काही सेकंदांनंतर इतर टोन जोडले जातात. म्हणून प्रत्येक वनस्पती विशिष्ट ध्वनी कंपन निर्माण करतात. अनुभवाने आपण एखादी वनस्पती केवळ संगीताच्या नोट्सद्वारे ओळखू शकतो. वातावरणातील बदल, जसे की वारा, प्रकाश आणि मानवी स्पर्श यामुळे पीच, स्वर आणि लयीमध्ये फरक येऊ शकतो आणि काही झाडे इतरांपेक्षा मोठ्याने गातात. वनस्पती आणि संगीत यांचा परस्परसंबंध हा विज्ञान, संस्कृती आणि निसर्ग यांना जोडणारा विषय आहे. अजूनही अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत, परंतु विद्यमान ज्ञानानुसार संगीत वनस्पतींच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करू शकते. संगीतामुळे वनस्पतींमध्ये होणारी प्रतिक्रिया ही जैविक पातळीवरील असली तरी तिचा प्रभाव मानवाला सौंदर्य, संतुलन आणि शांततेचा अनुभव देतो. संगीत केवळ मानवासाठी नाही, ते निसर्गासाठीही उपकारक ठरू शकते. म्हणूनच शेतात, बागेत किंवा घरातील रोपट्यांसाठी हलके, सुरेल संगीत वाजवणे हा निसर्गाशी संवाद साधण्याचा सुंदर मार्ग आहे.

# मतदारांनो, विकासाला मत द्या!



राकेश लोहार

आज रायगड जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण राज्यभरातील नगरपरिषदांसाठी मतदान होत आहे. गेली अनेक वर्षे प्रशासकीय राजवट असल्याने विकासाला खीळ बसल्याचे चित्र सर्वत्र दिसून आले, हेही खरेच! परंतु, आता खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधींची निवड होऊन नगरपरिषदांमध्ये लोकशाही येणार आहे, असे म्हटल्यास वावगे ठरु नये. सरकारी बाबूंचे दिवस संपले आता, असेच म्हणायची वेळ आली आहे. छोट्या-छोट्या कामांसाठीही जनतेची रखडपट्टी केली जात होती, इतकी मुजोरी प्रशासन चालवणाऱ्या बाबूंची होती. हे मीच नाही, तर जनताही असेच बोलताना दिसत होती. पण, आता चित्र बदलेल, याची आशा आहे. परंतु, त्यासाठी आपल्या माणसाना, विकासासाठी झटणाऱ्या, आपल्या परिसराची काळजी घेणाऱ्या, अडीअडचणींत धावून येणाऱ्या उमेदवारांला निवडून देणे काळाची गरज आहे. ती सर्वसामान्य मतदारांनी ओळखावे.

लोकशाहीची खरी शक्ती मतदराच्या एका मतात दडलेली असते. हे एक मत फक्त एका उमेदवाराचा भविष्य ठरवत नाही, तर संपूर्ण समाजाची दिशा बदलण्याची ताकद बाळगते. म्हणूनच मतदान करताना सर्वात मोठा विचार हा विकास हा असायला हवा. विकास म्हणजे फक्त योजना, घोषणा किंवा आश्वासने नव्हे, तो म्हणजे जीवनात जाणवलेला बदल. चांगले रस्ते, स्वच्छ वातावरण, शुद्ध पाणी, सुरक्षित रस्ते, उज्ज्वल शिक्षण, सर्वांसाठी आरोग्य आणि नोकरीच्या संधी, हीच खरी प्रगतीची चिन्हे आहेत. राजकारणात चांगली माणसं यावी आणि ती टिकावी, हे सर्व मतदारांच्या हातातच आहे. एका मताचं मोल काय आहे, हे उद्याची निवडणूक ठरवणार आहे.

विकास हा गाजावाजा करुन दाखवायचा विषय अजिबात नाही, याची जाणीव आपल्याला होणे गरजेचे आहे. कारण, शेवटी विकासच आपल्या आयुष्यात सुधारणा घडवतो. एखादा भाग विकसित होतो, तेव्हा तेथे फक्त इमारती उभ्या राहात नाहीत, तर लोकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसते. घराघरात आशेची किरणे पसरतात. ज्या उमेदवाराने असे प्रत्यक्ष बदल घडवून आणले आहेत किंवा पुढील काळासाठी स्पष्ट, वास्तववादी योजना तयार केली आहे, तोच खऱ्या अर्थाने विकासाचा वाहक ठरतो. असा उमेदवार निवडून आल्यास गावाचा, परिसराचा चेहरामोहरा बदलवून टाकतो, हेही तितकेच खरे.

आजकाल निवडणुका आल्या की मोठमोठी खोटी आश्वासने, आमिषं यांचा पाऊसच पाडला जातो. अशा घोषणांना सामान्य नागरिक बळी पडतात. परंतु, याबाबत सावधगिरी बाळगायला हवी. या पार्श्वभूमीवर मत देताना क्षणिक भावनांना किंवा दिखाऊ घोषणांना बळी पडणे टाळायला हवे. आपल्या मताचा परिणाम वषानुवर्षे जाणवतो, त्यामुळे निर्णय पण तितकाच विचारपूर्वक असायला हवा. आपण दिलेलं मत फक्त आजचं नव्हे, तर उद्याचं भविष्य घडवत असतं. म्हणूनच मतदानासाठी घराबाहेर पडताना एकच विचार मनात ठेवावा- आपल्या परिसराची, आपल्या लोकांची आणि आपल्या येणाऱ्या पिढ्यांची प्रगती कोण खऱ्या अर्थाने साधू शकतो. ज्याच्या कामात सातत्य आहे, ज्याच्या शब्दांमध्ये प्रामाणिकपणा आहे, ज्याच्या निर्णयांमध्ये पारदर्शकता आहे आणि ज्याच्या मनात खऱ्या लोककल्याणाची भावना आहे, असा उमेदवारच विकासाचा मार्ग दाखवू शकतो. असे नेतृत्व निवडले तर बदल दिसतो, प्रगती होते आणि समाज अधिक सक्षम बनतो. म्हणून सजग नागरिकाची एकच जबाबदारी आहे, ती म्हणजे विकासाला मत द्या. कारण, विकासाला दिलेले मत म्हणजे फक्त मतदान नव्हे, तर आपल्या भविष्यास दिलेला सबळ, सकारात्मक आणि आशादायी विश्वास आहे.

मतदान करताना बरेच काही दिसते- मोठमोठी भाषणे, गजबजलेले प्रचार, भावनिक घोषणा परंतु, सगळ्याच्या पलीकडे एक गोष्ट नेहमी सत्य राहते, काम कधीही खोटे बोलत नाही. ज्याने प्रत्यक्ष काम केले आहे, जो लोकांच्या समस्यांमध्ये उभा राहिला आहे, जो आश्वासने देऊन पळून जात नाही, तर ती पूर्ण करुन दाखवतो, तोच खऱ्या अर्थाने विकासाचा वाहक ठरतो. आपले एक मत म्हणजे आपल्या विकासाचा पाया आहे. लोकशाही मजबूत बनते ती भावनिक घोषणेने नव्हे, तर लोकांनी केलेल्या शहाण्या निवडीने. कारण, आजचा विचारपूर्वक घेतलेला निर्णय उद्याचे आयुष्य सुलभ, सुरक्षित आणि समृद्ध करु शकतो. म्हणूनच सजग नागरिकांनी भावनांपेक्षा वास्तवाला प्राधान्य देऊन, काम करणाऱ्याला आणि विकास घडवणाऱ्याला निवडून देणे गरजेचे आहे.म्हणूनच जबाबदारी जपून, वास्तवाला धरुन आणि प्रामाणिक कामाला ओळख देऊन मतदान करणे हीच नागरिकांची खरी ताकद आहे.

लोकसंसद

## वाढते प्रकाश प्रदूषण धोकादायक



एकीकडे वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण आणि जल प्रदूषणाची समस्या उग्र स्वरूप धारण करत असताना यामध्ये आता प्रकाश प्रदूषणाची भर पडली आहे. मात्र आजही आपल्याकडे प्रकाश प्रदूषणाकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. प्रकाश प्रदूषण म्हणजे रात्रीच्या वेळी अतिरिक्त कृत्रिम प्रकाशामुळे निर्माण होणारी स्थिती ज्यामुळे पर्यावरणातील परिसंस्थेवर नकारात्मक (इकोसिस्टिम) परिणाम होतो. प्रकाश प्रदूषणामुळे मानव आणि सृष्टीतील वन्यजीवांचे आरोग्य आणि वर्तन बिघडते. चमकदार डिजिटल होर्डिंग्जचा वाढता वापर, उत्सवांसाठी विस्तृत रोषणाई, रंगीबेरंगी दिव्यांच्या व्यावसायिक जाहिराती आणि रात्रभर प्रकाशमान असलेले रस्त्यावरील प्रखर प्रकाशाचे दिवे हे वाढत्या प्रकाश प्रदूषणाचे प्रमुख स्रोत आहेत. भरीस भर म्हणून क्रिकेट, फुटबॉल आणि इतर खेळांचे सामने दिवसा उजेडी नैसर्गिक प्रकाशात न खेळवता विजेचा अपव्यय आणि मोठ्या प्रमाणात प्रकाश प्रदूषण करून खेळवले जातात. वाढत्या प्रकाश प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर परिणाम होऊन झोपेचे विकार, लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, नैराश्य आणि कर्करोगाचा धोका वाढतो. कृत्रिम प्रकाशामुळे संभ्रमित झालेल्या वन्यजीवांच्या नैसर्गिक हालचालीत अडथळा निर्माण होतो. सध्य परिस्थितीत सर्व स्तरावर वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण आणि जल प्रदूषणासंदर्भात खूप मोठी जागरूकता निर्माण होत आहे. अशीच जनजागृती प्रकाश प्रदूषणाबाबत सर्व स्तरावर मोठा प्रमाणात होण्याची गरज आहे. कारण येणाऱ्या काळात वाढते प्रकाश प्रदूषण ही मोठी समस्या बनून राहणार आहे.

–प्रदीप अनुसया शंकर मोरे

दिनविशेष

# राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस

आज राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन. वाढत्या प्रदूषणामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांविषयी समाजात जागृती निर्माण करणे हा यामागचा उद्देश आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या या देशात आज सर्व संसाधने प्रदूषित होत आहेत. वायू प्रदूषणाची समस्या अत्यंत गंभीर आहे. प्रदूषणाच्या बाबतीत आज आपण जगात आघाडीवर आहोत. चीनमध्येही अशीच समस्या होती; परंतु त्यांनी ठोस कृती आराखडा तयार केला आणि त्याची गांभीर्याने अंमलबजावणी केली. चीन हे करू शकतो तर आपण का नाही करू शकत? भोपाळ वायू दुर्घटनेत प्राण गमावलेल्या लोकांच्या स्मरणार्थ दरवर्षी २ डिसेंबर रोजी भारतात राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याचा उद्देश लोकांना प्रदूषण रोखण्यास मदत करणाऱ्या कायद्यांची जाणीव करून देणे, औद्योगिक आपत्तींचे व्यवस्थापन आणि नियंत्रण याबाबत जागरूकता पसरवणे आणि औद्योगिक प्रक्रिया आणि मानवी निष्काळजीपणामुळे होणारे प्रदूषण रोखणे हा आहे. वास्तविक, वाढते वायूप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण हे आज जागतिक आव्हान बनले आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या जीवनासाठी अत्यावश्यक पंचमहातत्त्वांपैकी कोणता घटक आज प्रदूषणापासून मुक्त राहिला आहे? हवा, माती, पाणी सारेच प्रदूषित झाले आहे. ही पंचमहातत्त्वे जीवनाचा मूलाधार आहेत. त्यांच्याशिवाय जगण्याची कल्पनाच करता येत नाही. यापैकी कोणत्याही एका घटकाच्या अभावाने जीवन संपुष्टात येईल. भारताला हे सर्व घटक वारशाने विपुल प्रमाणात मिळाले आहेत. आपल्याकडे जंगले, पाणवठे, नद्या, पर्वत, माती, सुपीकता सारे काही होते. जीवनाचे आधार असलेले सर्व घटक येथे विपुल प्रमाणात असल्यामुळेच ते या भूमीच्या दिशेने पुन्हा पुन्हा येत राहिले. आपल्याकडील प्रदूषणाचा बोजा भूतानवरही पडत आहे. जीडीपी, लोकसंख्या, क्षेत्रफळ, क्षमता या बाबतीत तो आपल्यापेक्षा खूपच लहान देश आहे; परंतु उत्तम नैसर्गिक संतुलन राखलेला हा देश आहे. आपली संस्कृती नद्यांच्या काठांवर विकसित झाली आहे. कारण, शेतीयोग्य माती आणि पाण्याच्या उपलब्धतेमुळे तेथे जीवन सोपे झाले. एका अहवालानुसार, गंगेच्या मैदानात जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांच्या तुलनेत २१ पट अधिक वायू प्रदूषण आहे. या भागात देशाची बहुसंख्य लोकसंख्या राहते. घनदाट वस्तीमुळे तेथील लोकसंख्येचा मोठा भाग प्रदूषणाच्या विळख्यात आहे. लॅन्सेटच्या २०१९ च्या अहवालानुसार, वायू प्रदूषणामुळे भारतात दरवर्षी सुमारे १.६ दशलक्ष मृत्यू होत आहेत. हा आकडा एकंदरीत अकाली मृत्यूच्या आकडेवारीच्या १७ टक्के आहे. औद्योगीकरण हे वायू प्रदूषणाच्या प्रमुख तीन कारणांपैकी आहे. विकासासाठी ते आवश्यक आहे. मात्र, नियोजनशून्यतेमुळे अडचणी वाढल्या आहेत. शहराच्या मध्यभागी मोठा उद्योग उभारण्यासारख्या घटनांमुळे हवा प्रदूषित झाली. दुसरे म्हणजे आर्थिक विकासाच्या नावाखाली मोठे महामार्ग, कॉरिडॉर बांधले गेले. ते आवश्यकही आहे; पण त्यासाठी लाखो झाडे तोडण्यात आली. भरपाई म्हणून नवी झाडे लावण्याचे आश्वासन दिले गेले; परंतु ते पूर्ण होणार का, हा प्रश्न आहे. तिसरे प्रमुख कारण म्हणजे वाहनांची वाढती संख्या होय.सन २००० पासून रस्त्यांवरील वाहनांची संख्या चार पटींनी वाढली आहे. त्यामुळे प्रदूषण अधिक गंभीर बनले आहे. गरज असेल तरच कार घ्या, असा स्वीडनमध्ये नियम आहे. एकाच ठिकाणी तीन दिवसांपेक्षा जास्त काळ वाहन उभे राहिल्यास त्यावर दंड आकारला जातो; परंतु याउलट आपल्या देशातील अनेक कुटुंबांकडे चार ते पाच वाहने आ-हेत. प्रदूषकांमध्ये पीएम २.५ ची चर्चा होते; परंतु पीएम १० वर मात्र चर्चा होत नाही. या प्रदूषणाची निर्मिती रस्त्याकडेच्या धुळीमध्ये होते. वायू प्रदूषणामुळे सरासरी आयुर्मान दोन ते अडीच वर्षांनी कमी झाले आहे. कर्करोगाचे आव्हान लक्षात घेऊन लोकांना दारू आणि सिगारेट सोडण्याचे आवाहन केले जाते; परंतु प्रदूषणासोबतच या सवयींमुळेही लोकांना धोका निर्माण झाला आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२ डिसेंबर**

१) श्री.दामोदर मोरश्वर पडते
मु.गुंजीस, अलिबाग
२-१२-१९३८
२)श्रीम.अनुप्रिया निवास मसाळ
विद्यानगर अलिबाग
२-१२-१९४७

## होडी उलटून मच्छिमार बेपत्ता

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी तालुक्यातील निसर्गरम्य गावखडी येथे रविवारी (दि.३०) सायंकाळी एक दुर्दैवी घटना घडली. येथील खाडीत मासेमारी करत असताना एका मच्छिमाराची छोटी होडी उलटल्याने ते पाण्यात बुडाले. अस्लम युनूस पेजे (वय ५६, रा. गावखडी, रत्नागिरी) असे या मच्छिमाराचे नाव असून, त्यांचा शोध अद्याप सुरू आहे. या घटनेमुळे गावखडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अस्लम पेजे हे गावखडी येथील स्थानिक रहिवासी आहेत. रविवारी सायंकाळी ते नेहमीप्रमाणे आपली छोटी होडी घेऊन गावखडीच्या खाडीत मासेमारीसाठी गेले होते. मासेमारी करत असतानाच पाण्याचा अंदाज न आल्याने किंवा तोल गेल्याने त्यांची होडी अचानक पाण्यात उलटली. होडी उलटल्याचे लक्षात येताच आजूबाजूच्या काही लोकांनी आरडाओरडा केला, मात्र अस्लम पेजे हे पाण्यात दिसेनासे झाले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ आणि मच्छिमारांनी घटनास्थळी धाव घेतली. रविवारी सायंकाळपासून त्यांचा शोध घेण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

# सरकारी सेवेत समायोजन करा

## ●अन्यथा ‘स्वेच्छा मरणाची’ परवानगी द्या; समग्र शिक्षा योजनेतील कर्मचाऱ्यांची मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**सरकारी सेवेत समायोजन करून कायम करावे, अन्यथा ‘स्वेच्छा मरणाची’ परवानगी द्यावी, अशी मागणी राज्यातील महाराष्ट्र राज्य समग्र शिक्षा योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केली असून आपल्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान ८ डिसेंबर २०२५ पासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. समग्र शिक्षा करार कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने हे आंदोलन करण्यात येणार आहे.**



मागील २० वर्षे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे. काही कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्तीचा कालावधी ३ महिने किंवा ६ महिने इतका राहिला आहे. तर मागील ४ वर्षांत ५० टक्के कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त झाल्या. मात्र कोणताही लाभ नसल्याने कुटुंबाचे आरोग्य आणि शैक्षणिक व आर्थिक समस्या वाढत आहेत. या योजनेतील निम्म्या कर्मचाऱ्यांना ८ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार कायम करण्यात आले, पण उर्वरित कर्मचाऱ्यांवर अन्याय करण्यात आला.

पंजाब, मणिपूर, सिक्कीमसारख्या राज्यांनी समग्र शिक्षा योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले, तर आसाम, मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्ये वेतन आयोगाप्रमाणे वेतन आणि कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे सुविधा दिल्या जात असताना महाराष्ट्रात मात्र दुर्लक्ष करण्यात येत आहे. मागील ८ वर्षांपासून मानधनात वाढ झालेली नाही. मानधनाव्यतिरिक्त इतर शासकीय सेवा सुविधांचा कोणताही लाभ मिळालेला नाही. तसेच, सेवेत असताना २५७ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला, पण त्यांच्या कुटुंबांना कोणतीही आर्थिक मदत मिळाली नाही. बँक कर्ज देत नाही आणि कुटुंबातील सदस्यांचे आजारपण, मुलांचे उच्च शिक्षण यासारख्या गरजा पूर्ण करता येत नाहीत.

### कुटुंबातील सदस्यही आंदोलनात सहभागी होणार

मागील २० वर्षांपासून तुटपुंज्या मानधनावर आणि कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या या कर्मचाऱ्यांनी समग्र शिक्षा योजनेतील सर्व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजन करून कायम करावे. तसेच शासन सेवेत कायम न केल्यास ‘स्वेच्छा मरणा’ची परवानगी द्यावी, अशी मागणी सरकारकडे केली आहे. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनादरम्यान कर्मचारी अन्नत्याग, शंखनाद, थाळीनाद, घंटानाद, टाळनाद, आक्रोश, भीकमागो, मूक आंदोलन आणि आत्मक्लेश आंदोलन करणार आहेत. आंदोलनाला सुरुवात झाल्यानंतर सहाव्या दिवशी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यही आंदोलनात सहभागी होतील, असा इशाराही समितीने दिला.

## लाकूड तस्करीवर वन विभागाची कारवाई

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

चिपळूण तालुक्यातील असुर्डे महामार्गावर वन विभागाने रविवारी (दि.३०) सकाळी मोठी कारवाई करत लाकूड माफियांना दणका दिला आहे. विनापरवाना आणि अवैधरित्या खैराच्या लाकडाची वाहतूक करणारी गाडी वन विभागाने पकडली. यात सुमारे ८० मण खैर लाकूड आढळून आले आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध लाकूड वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



८० मण खैर साठा जप्त

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास असुर्डे महामार्गावरून एका मोटारीतून संशयास्पदरीत्या लाकूड वाहतूक होत असल्याची माहिती वन विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वनपाल रेशमा कावळे आणि वन कर्मचारी जाधव यांच्या सतर्क पथकाने सापळा रचला. त्यांनी संशयास्पद वाटणारे वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यात मोठ्या प्रमाणात खैराचे लाकूड असल्याचे निदर्शनास आले. तन्मय मंगेश सुर्वे (रा. साखरपा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या गाडीमध्ये सुमारे ८० मण खैराचे लाकूड होते. हे लाकूड दहीवली येथील एका कात-भट्टीवर नेले जात होते, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

## प्रवाशानेच उबेरचालकाला लुटले

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

कल्याणमध्ये वालधुनी भागात एका उबेरचालकाला वाहनातील प्रवाशानेच चाकूचा धाक दाखवून लुटले. अंधेरी येथील मोहम्मद उद्दीन हे शुक्रवारी संध्याकाळी कल्याणमध्ये पश्चिम रेल्वे स्थानक भागात असताना त्यांना उबरच्या उपयोजनवरून एका प्रवाशाने मुंबईत बांद्रा येथे जाण्यासाठी नोंदणी केली. या प्रवाशाला मोहम्मद यांनी कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील दीपक हॉटेल समोरील रस्त्यावरून मोटारीत घेतले. मोटार सुरू झाल्यावर वाहनात बसलेल्या प्रवाशाने आपणास आणखी एक प्रवासी माझा मित्र कल्याण पूर्वेतील वालधुनी अशोकनगर भिवंडीवाला चाळ भागातून घ्यायचा आहे. त्यामुळे मोहम्मद यांनी वालधुनी भागात मोटार वळवली. मोटार वालधुनी भागात रेल्वे क्वॉर्टर असलेल्या भागात अंधार असलेल्या भागात गेल्यानंतर प्रवाशाने मोहम्मद यांचा मोबाईल मागण्यास सुरूवात केली. चालकाने तो देण्यास नकार दिला. त्यावेळी प्रवाशाने दमदाटी करत जवळील चाकू बाहेर काढून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्याने मोहम्मदच्या हातामधील मोबाईल हिसकावून घेतला. त्याचा संकेतांक मिळवून मोहम्मदच्या बँक खात्यामधील तीन हजार रूपये आपल्या बँक खात्यात वळते करून घेतले. तसेच, त्याच्यांकडील पाच हजार रूपये प्रवाशाने काढून घेतले.

## महिलेवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

मिरा रोड येथील हाटकेश भागात मद्यधुंद अवस्थेत असलेल्या तरुणांमधून एकाने एका महिलेवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना घडली आहे. हा प्रकार स्थानिकांनी मोबाईल कॅमेरामध्ये कैद करून तरुणीची यातून सुटका केली आहे.

मिरारोड येथे हाटकेश परिसर आहे. या परिसरातील मोकळ्या जागेत एक तरुण मुलीवर अतिप्रसंग करत असल्याचे काही तरुणांना दिसून आले होते. काहीतरी गैरप्रकार सुरु असल्याचे निदर्शनास येताच तरुणांनी हा प्रकार मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद करण्यास सुरुवात केली. यात महिलेने विरोध करण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांनी यात हस्तक्षेप केला. यावेळी सदर तरुण आपल्याला शारीरिक संबंध करण्यासाठी जबरदस्ती करत असल्याचे महिलेने सांगितले. तर ही मुलगी आपली पत्नी असल्याचा तरुण दावा करत होता. दोघेही मद्यधुंद अवस्थेत दिसून आल्यामुळे नागरिकांनी याबाबतची माहिती पोलिसांना दिली. दरम्यान या घटनेची चित्रफीत समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे.

## बळीराम मुंबईकर यांचे निधन

**उरण :** वेश्वी गावचे सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर यांचे वडील बळीराम तुकाराम मुंबईकर यांचे गुरुवारी (दि.२७) वयाच्या ८७व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुलगे, सुना, नातवंडे, पंतवंडे असा परिवार आहे. त्यांचे होमहवन विधी शनिवार दि.२९ नोव्हेंबर रोजी, तर दशक्रिया विधी शनिवार दि.०६ डिसेंबर रोजी, तर उत्तरकार्य विधी मंगळवार दि. ०९ डिसेंबर रोजी होणार आहेत.



## ऐतिहासिक तळगडावर सापडला चोर दरवाजा

### दुर्गरत्न प्रतिष्ठानची यशस्वी कामगिरी

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा शहरातील ऐतिहासिक तळगड किल्ल्यावर शिवकालीन चोर दरवाजा सापडला आहे. हा चोर दरवाजा शोधण्याची यशस्वी कामगिरी दुर्गरत्न प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांनी बजावली आहे. तळगडावर कित्येक वर्ष मातीत लुप्त झालेल्या चोर दरवाजाबद्दल प्रतिष्ठानच्या सदस्यांना माहिती मिळाली असता काही अभ्यासकांकडून गडाची माहिती घेण्यात आली. त्यानंतर नकाशाच्या सहाय्याने चोर दरवाजाची शोध मोहीम सुरू करण्यात आली. अखेर या शोध मोहिमेला यश मिळाले व गेली कित्येक वर्षे लुप्त झालेला चोर दरवाजा सापडला. माती जाऊन हा चोर दरवाजा मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडला गेला होता. दुर्गरत्न प्रतिष्ठानच्या सदस्यांनी आपल्या अथक परिश्रमाने दोन मोहिमांमध्ये हा चोर दरवाजा पूर्वीसारखा पूर्णपणे मोकळा केला. यामुळे तालुक्यातील नागरिकांसह तळगडावर येणाऱ्या पर्यटकांनाही हा शिवकालीन चोर दरवाजा पाहता येणार आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी दुर्गरत्न प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.



## शेतकऱ्यांचे बँकांच्या दारात हेलपाटे

### अवजारांसाठी कर्ज प्रस्ताव मंजुरीला विलंब

**। दापोली । प्रतिनिधी ।**

कृषी समृद्धी योजनेअंतर्गत दापोली तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती अवजारे उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने निधी तर दिला; मात्र प्रत्यक्ष लाभ मिळविताना शेतकऱ्यांना बँकांच्या दारात हेलपाटे घालण्याची वेळ आली आहे. ‘आज या, उद्या या’, अशी बँकांची परवड सुरू असून, कर्ज प्रस्ताव मंजुरीला होत असलेल्या विलंबामुळे आगामी हंगामातील शेतीकामांवर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.



तालुक्यातील एकूण ४८ सजे अंतर्गत ४०० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून, या योजनेअंतर्गत सुमारे ९ कोटींच्या निधीची तरतूद आहे. कृषी अवजारे खरेदीतून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अनुदानाचा लाभ मिळणार आहे. स्वावलंबी शेती हा शासनाचा प्रमुख हेतू असतानाही बँकांच्या कारभारामुळे तो मार्गी लागताना अडथळे निर्माण होत आहेत. मात्र बँकांकडून सीबील स्कोअर, अतिरिक्त कागदपत्रे, हमीदार, अशा कारणांवरून कर्ज प्रक्रियेला विलंब लावला जात असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक अडचण अधिकच वाढली आहे.

> शेतकऱ्यांना कर्ज मिळविण्यात अडचण भासत असल्यास त्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधावा. योग्य ते मार्गदर्शन व मदत केली जाईल.
> – हेमंत ठोंबरे, तालुका कृषी अधिकारी, दापोली

वेळेत कर्ज न मिळाल्यास यांत्रिकीकरणाच्या नियोजित कामांना उशीर होणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेवर त्याचा परिणाम होणार आहे.

## हुतात्मा भाई कोतवाल यांना अभिवादन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

हुतात्मा भाई तथा विठ्ठलराव कोतवाल यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त कर्जत, माथेरान आणि नेरळ येथे अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माथेरान येथे नगरपरिषदेच्या वतीने हुतात्मा भाई कोतवाल यांना अभिवादन करण्यासाठी मशाल फेरी काढण्यात आली. १ डिसेंबर १९१२ मध्ये माथेरानमध्ये जन्मलेले विठ्ठलराव कोतवाल यांनी देश पारतंत्र्यात असताना १९३७ मध्ये भाई कोतवाल यांनी माथेरान शहरातील कष्टकरी कामगार वर्गासाठी भाऊसाहेब राऊत यांच्या मदतीने माथेरान नागरी पतसंस्था स्थापन केली. तर १९४२ मध्ये महात्मा गांधी यांच्या ब्रिटिशांविरुद्ध चलेजावची हाक दिली होती. त्यावेळी कर्जत तालुक्यातील देशप्रेमी तरुण यांना एकत्र करून देशाच्या स्वतंत्र लढ्यात भाग घेतला होता. त्यांना २ जानेवारी १९४३ मध्ये ब्रिटिशांच्या गोळीचा वेध घेतल्याने ते हुतात्मा झाले होते. त्यांचा जयंती दिवस माथेरान तसेच कर्जत आणि नेरळ येथे अभिवादन करण्यात येते. नेरळ येथे हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांना अभिवादन करण्यात आले.

### महानगरपालिकेकडून प्रभावी उपाययोजना | नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

# वायू गुणवत्ता निर्देशांकात लक्षणीय सुधारणा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बृहन्मुंबई (मुंबई शहर व उपनगरे) क्षेत्रातील वायू प्रदूषण नियंत्रणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विविध प्रभावी उपाययोजना केल्या जात आहेत. यामध्ये खासगी प्रकल्पांसह रस्ते, मेट्रो आदी शासकीय प्रकल्पांचाही समावेश आहे. वाऱ्याच्या वेगातही आता सुधारणा झाली आहे. या सर्वसमावेशक कारणांमुळे मुंबईतील वायू गुणवत्ता निर्देशांकात (एक्यूआय) दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ पासून सातत्याने सुधारणा होत असून मागील ४८ तासांत लक्षणीय सुधारणा आढळली आहे. महानगरपालिकेने जारी केलेल्या २८ मुद्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन होईल, यावर भर दिला जात आहे. यासाठी विविध बांधकामांना ‘कामे थांबवा’ नोटीस बजावण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्या खासगी, शासकीय, अशासकीय प्रकल्पांवर यापुढेही कारवाई सुरूच ठेवावी, असे सक्त निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

तसेच, ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन स्टेज-४ (ग्रॅप-४) मुंबईसाठी सध्या लागू नाही. मात्र, संनियंत्रणासंदर्भात (मॉनिटरिंग) निर्देश देण्यात आले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी म्हणाले की, बृहन्मुंबई क्षेत्रातील वायू प्रदूषण नियंत्रणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रभावीपणे उपायोजना केल्या जात आहेत. यामध्ये बेकरी तसेच स्मशानभूमीचे स्वच्छ इंधनावर परिवर्तन, धूळ आटोक्यात आणण्यासाठी मिस्टींग मशीनच्या सहाय्याने फवारणी, पाण्याने रस्ते धुऊन काढणे आणि विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन, नागरिकांमध्ये जनजागृती यासह विविध उपाययोजनांचा समावेश आहे.

वायू प्रदूषण नियंत्रणासाठी दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने २८ मुद्यांचा समावेश असलेली सर्वंकष मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांचे काटकोरपणे पालन व्हावे, यासाठी महानगरपालिकेकडून सर्व प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावर एकूण ९४ भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकांनी खासगी प्रकल्पांसह रस्ते, मेट्रो आदी शासकीय प्रकल्पांची पाहणी करत मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्यांना नोटीस बजावल्या आहेत. बांधकाम स्थळी संवेदक (सेन्सॉर) आधारित वायू गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) मोजणारे संयंत्र कार्यान्वित राहतील, याची पाहणीसुद्धा या पथकाकडून सुरू आहे. मुंबई बंदर प्राधिकरण परिसरात पेटवल्या जाणाऱ्या शेकोट्या बंद करण्याच्या सूचनेला संबंधित यंत्रणेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे, असेही गगराणी यांनी नमूद केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरू असलेल्या विविध उपाययोजनांमुळे दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ पासून मुंबईतील वायू गुणवत्ता निर्देशांकात (एक्यूआय) सातत्याने सुधारणा दिसून येत आहे. तसेच, दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी वाऱ्याचा वेग ताशी ३ ते ४ किलोमीटर होता तसेच वातावरणात आर्द्रता होती. मात्र, आता त्यात सुधारणा होऊन वाऱ्याचा वेग ताशी १० ते १८ किलोमीटरपर्यंत पोहोचला आहे.

> मुंबईतील वायू प्रदूषण नियंत्रणाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे सर्व खासगी, शासकीय, अशासकीय प्रकल्पांच्या ठिकाणी काटेकोरपणे करावे, बेकऱ्यांचे लवकरात लवकर स्वच्छ इंधनावर परावर्तन करावे तसेच नागरिकांनी उघड्यावर कचरा जाळणे टाळावे आणि महानगरपालिकेच्या प्रयत्नांना सहकार्य करावे.
> –भूषण गगराणी, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक

## निवडक

### लोकसहभागातून बांधले बंधारे



**रत्नागिरी :** तळवडे निर्मल ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी ‘एक दिवस बंधाऱ्यांसाठी’ या अभिनव उपक्रमांतर्गत लोकसहभागातून संपूर्ण गावात एकूण १३ बंधारे बांधले. पाणीटंचाईवर मात करणे व जमिनीतील पाणीसाठा वाढवण्यासाठी एक दिवस बंधाऱ्यासाठी या अभिनव उपक्रमांतर्गत लोकसहभागातून कच्चे बंधारे, वनराई व विजय बंधारे बांधण्याचे आवाहन शासनामार्फत करण्यात आले होते. यानुसार हे बंधारे बांधण्यात आले. यावेळी सरपंच गायत्री साळवी, उपसरपंच यशवंत साळवी, ग्रामपंचायत अधिकारी मंगेश जाधव यांच्यासह शासनाच्या या महत्त्वपूर्ण अभियानात गावातील ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, आशा वर्कर्स, बचत गटातील महिला अंगणवाडी सेविका, इतर सर्व शासकीय कर्मचारी आणि शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लालपरीचा डिजिटल कारभार रामभरोसे



**मुंबई :** एसटी बस ही महाराष्ट्रातील प्रत्येक गावाची जीवनवाहिनी झाली आहे. आपल्याला गाव, खेड्यापर्यंत पोहोचवणारी लालपरी म्हणजे राज्य परिवहन महामंडळाची बस. मात्र याच लालपरीचा डिजिटल कारभार रामभरोसे असल्याचे समोर आले आहे. एमएसआरटीसी या ॲपवरून तिकीट बूक करताना तांत्रिक समस्या येत असून यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. राज्य परिवहन महामंडळाने तिकीट प्रवाशांच्या सोयीसाठी हे ॲप आणले. या ॲपवरून घरबसल्या महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील तिकीट बूक करता येते. मात्र हे तिकीट बूक करताना सध्या सर्व्हिस अनअव्हेलेबल असा एरर येत आहे. वारंवार रिफ्रेश केल्यानंतर ॲप सुरू झाले तर तिकीट बूक करताना पैसे खात्यातून कट होतात. मात्र तिकीट बूक होत नाही. सदर तिकीट फेलमध्ये जाते. फेल झालेल्या तिकीटाचे पैसे परत मिळवण्यासाठी वेळ लागत आहे. याबाबत आगारामध्ये चौकशी केल्यावर दर काही दिवसांनी ॲपमध्ये समस्या येत असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे प्रवाशांचे नाहक हाल होत आहेत.




### पालीत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**राबगाव/पाली :** भारतातील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात जागतिक पातळीवर वेगाने वाढत असताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही या प्रवाहात सहभागी होणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी वैज्ञानिक म्हणून पुढे आल्यास देशाचा सर्वांगीण विकास होईल, असे प्रतिपादन सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा गीता पालरेचा यांनी केले. शिक्षण विभाग पंचायत समिती सुधागड पाली, विज्ञान-गणित अध्यापक मंडळ, सुधागड व सु.ए.सो.चे ग.बा.वडेर हायस्कूल व वसंतराव गणेशमल ओसवाल ज्युनियर कॉलेज पाली यांच्या संयुक्त विद्यमाने ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन सन २०२५-२६चे दि.१ व २ डिसेंबर रोजी सु.ए.सो.चे ग.बा. वडेर हायसकूल व वसंतराव गणेशमल ओसवाल ज्युनियर कॉलेज पाली येथे आयोजित केले होते. या विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटनांप्रसंगी त्या बोलत होत्या. या विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटात २९ तर माध्यमिक गटात १७, शिक्षक प्राथमिक गट ३ माध्यमिक गट ३ उपकरणांची मांडणी करण्यात आली. पहिल्याच दिवशी ७०० ते ८०० विद्यार्थ्यांनी सदर प्रदर्शन पाहण्यासाठी सहभाग नोंदविला. दरम्यान, सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना अंधश्रद्धेपासून लांब राहून विज्ञानाची कास धरण्याचे आवाहन केले.

### दुसऱ्या विठ्ठल मूर्तीचे लोकार्पण

**ठाणे :** भाईंदरच्या गोडदेव गावातील जुन्या तलावात उभारण्यात आलेल्या ५१ फूट उंच विठ्ठल मूर्तीचे लोकार्पण करण्यात आले आहे. सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात आलेली काशीमिरानंतरची ही दुसरी भव्य मूर्ती आहे. मिरा भाईंदर शहरात जवळपास १७ तलाव आहेत. या तलावांभोवती महापालिकेने उद्याने उभारली आहेत. याशिवाय तलावाच्या सुशोभीकरणावर देखील महापालिकेकडून खर्च केला जात आहे. दरम्यान, गोडदेव येथील जुने तलाव व जरीमरी तलावात विठ्ठलाची उंच मूर्ती बसवण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली होती. त्यावरून यासाठी आवश्यक असलेला निधी देखील शासनाने विशेष निधीच्या तरतुदीखाली मंजूर केला आहे. त्यानुसार आता ५१ फूट उंच विठ्ठलाची उभी मूर्ती उभारण्याचे काम सुरु केले. त्यानुसार २० नोव्हेंबर रोजी काशिमीरा येथील मूर्तीचे प्रसिद्ध कीर्तनकार इंदूरीकर महाराज यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले होते. तर आता दुसऱ्या मूर्तीचे देखील रविवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि गावाकऱ्यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. यावेळी कीर्तन अभंग आणि प्रवचनाच्या कार्यक्रमामुळे भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



### रुग्णवाहिकेची बुलेटला धडक

**चार जण जखमी**

**रत्नागिरी :** रत्नागिरी-हातखंबा मार्गावर कारवांचीवाडी फाटा येथे रविवारी दुपारी अपघात घडला. एका भरधाव रुग्णवाहिकेने पुढे जाणाऱ्या बुलेटला मागून जोरदार धडक दिली. या अपघातात बुलेटवरून प्रवास करणारे पती-पत्नी आणि त्यांची दोन लहान मुले असे चौघेही जण रस्त्यावर कोसळून जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मयुरी किरण नवाळे (वय २९, रा. निनाई परळी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर) या त्यांचे पती किरण रामचंद्र नवाळे (३१) आणि दोन मुले श्रद्धा (९) व श्रेयस (८) यांच्यासह आपल्या बुलेट मोटारसायकलवरून प्रवास करत होते. ते हातखंबा ते रत्नागिरी जाणाऱ्या रोडवर कारवांचीवाडी फाटा येथे आले असता, त्यांच्या पाठीमागून आलेल्या एका अँम्बुलन्सने बुलेटला धडक दिली. या धडकेमुळे बुलेटवरील चारही जण खाली पडले आणि त्यांना दुखापत झाली. या अपघाताला कारणीभूत ठरलेला रुग्णवाहिकाचालक चेतन जयसिंग मयेकर (रा. वांद्री, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी) याच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निवडक

## डिजीटी महाविद्यालयाची वृध्दाश्रमास भेट




**माणगांव :** माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे डि.जी.टी. महाविद्यालयातील आजिवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या विद्यार्थांनी (दि.२९) नोव्हेंबर रोजी माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे व प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली माऊली वृध्दाश्रम बोरवाडी निजामपुर येथे भेट दिली. या भेटीच्यावेळी विदयार्थ्यांनी याप्रसंगी फळे, व वस्तु देण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आजिवन अध्ययन विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. मेहरीन डावरे, प्रा. देवांक परब, डॉ. पाण्डे. जे. आर. प्रा. मंजीरी सावंत, प्रा. नेहाल वलीले, प्रा. पंकज गायकवाड यांनी मोलाचे सहकार्य केले.

## राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे एड्स जनजागृती



**माणगांव :** रेड रिबन क्लब व माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती करण्यासाठी (दि.१) डिसेंबर रोजी विविध तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व्याख्याने, पथनाटय, पोस्टर मेकींगचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी आजिवन अध्ययन आणि विस्तार विभाग विभागप्रमुख प्रा. मेहरीन डावरे व राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. नेहा तुराई, प्रा. डॉ. पाण्डेय जे. आर, प्रा. स्वप्नील सकपाळ, प्रा. विशाखा पवार, प्रा. श्वेता सकपाळ, प्रा. श्रावणी बक्कम, प्रा. पंकज गायकवाड आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## लक्ष्मीव्रतामुळे फळां-फुलांना मागणी

**पाताळगंगा :** मार्गशीर्ष महीना महीला वर्गांसाठी अत्यंत पवित्र मानला जातो. घरोघरी लक्ष्मी मातेची यथासांग पुजा केली



जाते. दर गुरुवारी लक्ष्मी मातेच्या मुखवट्यांची पुजा केली जात असल्यामुळे, बाजार पेठेत मोठ्याप्रमाणात फळे, फुले यांना मोठी मागणी आहे. फळांचा प्रसाद म्हणून महीलावर्ग सायंकाळी ग्रहण करीत असतात. दर गुरुवारी फळा-फुलांनी तसेच पूजेला लागणाऱ्या साहित्यांला बाजारात मागणी वाढली आहे. मार्गशीर्ष महिन्यात येणाऱ्या चार गुरुवारी हा सोहळा साजरा करण्यात येतो. तसेच शेवटच्या गुरुवारी उद्यापन केले जाते. एकंदरीत या महिन्यात प्रत्येक गुरुवारी घराघरांमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झालेले प्रत्येकांच्या घरी पहावयास मिळत आहे.

## मोहोपाड्यात मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

**रसायनी :** शंकरा आय हॉस्पिटल आणि रोटरी क्लब ऑफ रसायनी पाताळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्रचिकित्सा



आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर पार पडले. शिबिराचे उद्घाटन विजय पाटील, गणेश वर्तक, गणेश काळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या शिबिरात ८० रुग्णांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी ३० रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पीटल पनवेल येथे दाखल करण्यात आले आहे. याप्रसंगी शंकरा हॉस्पीटलचे व्यवस्थापक प्रकाश पाटील, गणेश काळे, शशीकांत शानभाग, धनंजय जोशी यांची उपस्थिती लाभली. गणपती मंदिर देवस्थान समितीच्या सहकार्याने हे शिबीर यशस्वीपणे पार पाडले.

# स्मारक कट्ट्याचा पार्किंगसाठी वापर

### वीरभाई कोतवाल यांच्या स्मरणार्थ बांधलेल्या वास्तूचा विसर; बकाल परिस्थितीचे वास्तव पर्यटकांसमोर सादर

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान गिरिस्थान नगरपरिषद हद्दीतील असलेल्या हुतात्मा स्मारकाच्या कट्ट्यावर ई-रिक्षा पार्किंगसाठी केला असुन, परिसरात बकाल परस्थिती झाली आहे. देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्मा वीरभाई कोतवाल यांचे स्मारकाचे पवित्र राखण्यात माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेला विसर पडला आहे. हुतात्मा स्मारक परिसर स्वच्छ व सुंदर राखण्या पेक्षा अस्वच्छता व बकाल परिस्थिती निर्माण झाली आहे.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कालखंडानंतर ब्रिटिश राजवटीमध्ये माथेरानचा शोध हा मे १८५० मध्ये ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी ह्यू पॉयंट्झ मालेट यांनी लावला. तर त्यावेळचे मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टन यांनी भविष्यातील हिल स्टेशन म्हणून विकासाचा पाया घातला व इंग्रजांनी माथेरानला उन्हाळ्याच्या उष्णतेवर मात करण्यासाठी एक लोकप्रिय रिसॉर्ट म्हणून विकसित करण्यात आले होते.

कर्जत तालुक्यातीत सह्याद्री डोंगर रांगेतील डोंगर माथ्यावर वसलेले थंड हवेचे जगप्रसिद्ध ठिकाण म्हणून माथेरानला ओळख प्राप्त झालेल्या माथेरानच्या भूमित १ डिसेंबर १९१२ रोजी एका न्हावी समाजातील कुटुंबात जन्माला आलेले व ब्रिटीश राजवटीच्या विरोधात असलेल्या लढ्यात स्वतःला झोकून देत देश स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाची आहुती देणारे स्वातंत्र्यसैनिक वीरभाई कोतवाल यांचे जन्मस्थान म्हणून याच माथेरानची मुख्य ओळख आहे.

देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्मा वीरभाई कोतवाल यांचे स्मरणार्थ त्यावेळचे राज्याचे मुख्यमंत्री बॅरिस्टर अब्दुल रहमान अंतुले यांच्या कार्यकालात राज्य शासनामार्फत स्मारक बांधले आहे. याच स्मारक परिसरात माथेरान गिरिस्थान नगरपरिषदे माध्यमातून माथेरानमधील नागरिकांसाठी सामाजिक कार्यक्रमासाठी दीड कोटी रूपये खर्च करून कम्युनिटी सेंटर हॉलचे देखील बांधण्यात आले आहे. तर या कम्युनिटी सेंटर हॉलमध्ये अंगणवाडी शाळा देखिल सुरू आहे.

मात्र, माथेरान गिरिस्थान नगरपरिषदे कडून देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्मा वीरभाई कोतवाल यांचे स्मारकाच्या कट्ट्यावर त्यांच्या मालकीच्या ई-रिक्षा पार्किंगसाठी केल्या आहे. तर कम्युनिटी सेंटर हॉल व हुतात्मा वीरभाई कोतवाल पडलेले परिसरात असताव्यस्त पडलेले साहित्य व मोडकळीस आलेल्या लोखंडी मालवाहतूक हातगाड्या आदी सामान व वस्तूनचा खच पडल्याने, हुतात्मा स्मारक परिसरातील निर्माण झालेल्या बकाल परिस्थितीमुळे सदर बकाल परस्थितीचे वास्तव हे माथेरानमध्ये जग व देशभरातून येणाऱ्या पर्यटकांसमोर येत आहे. मात्र या बकाल अवस्थेकडे माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने, देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्मा वीरभाई कोतवाल यांचे स्मारकाचे पवित्र राखण्याचा विसर हा माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेला आहे.

> ई-रिक्षा कम्युनिटी सेंटर हॉलमध्ये ठेवण्यात आल्या होत्या सध्या कम्युनिटी सेंटर हॉलमध्ये ट्रेनिंगचे काम सुरू असल्याने, इ रिक्षा या बाहेर काढण्यात आल्या आहे. या इ रिक्षा हुतात्मा वीरभाई कोतवाल यांचे स्मारकाच्या कट्ट्यावर लावल्या असतील. तर त्या ठिकाणावरून त्वरीत काढल्या जातील. - राहुळ इंगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी, माथेरान नगरपरिषद,

# पनवेलमध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय



**| पनवेल | प्रतिनिधी |**

मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायातून सहा महिलांची गुन्हे शाखा पोलिसांनी सुटका केली आहे.

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आरपणाच सलून आणि स्पा शॉप नंबर ०१, देवीज्योती हॉटेलचे जवळ, जुहूनगर, जुहूगाव, सेक्टर ११, वाशी, नवी मुंबई येथे ६०००/- रूपये घेऊन मसाजच्या नावाने तेथे असलेल्या महिलांकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेत आहेत. वपोनि घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास आरपणाच सलुन आणि स्पा येथे पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी सहा महिला वेश्यागमनाकरिता ठेवलेल्या मिळून आल्या. स्पाची महिला मॅनेजर असिमा रॉबिन घोष, वय ३४ वर्षे, रा. रूम नंबर ०३, साईकुंज सोसायटी, सेक्टर ११, वाशी, नवी मुंबई. मूळ रा. कोलकत्ता व तिचा पार्टनर आलम शेख, रा. चेंबुर यांनी आपापसात संगनमत करून सहा महिलांना बॉडी मसाज करण्याच्या नावाने प्राप्त केल्या. त्या महिलांना वेश्या व्यवसायासाठी बनावट ग्राहकास दाखवून व्यवसायाचा मोबदला म्हणून सहा हजार रूपये स्वीकारले.

महिला आरोपी व आलम शेख यांच्याविरूध्द वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्यातील अटक महिला आरोपीला दि. ४ डिसेंबर रोजीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास वाशी पोलीस ठाणे करत आहे. ही कारवाई सहा. पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि पृथ्वीराज घोरपडे, सपोनि योगेश देशमुख, पोउपनिरी सरिता गुडे, पोहवा मांडोळे, पोशि ठाकूर, पोशि चव्हाण, पोशि पारासुर, पोशि चव्हाण, पोहवा अडकमोल, पोना अनिता भोये तसेच चालक पोहवा मोहिते यांनी केली आहे.

## मंगेश जाधवांना कलाभूषण पुरस्कार




**| महाड | प्रतिनिधी |**

सम्यक कोकण कला संस्था (रजि.) महाराष्ट्र या संस्थेचा रौप्यमहोत्सवी २५ वा वर्धापनदिनी महाड तालुक्यातील खुटिल गावचे मंगेश जाधव यांना राज्यस्तरीय सम्यक कला भूषण या मानाच्या पुरस्काराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन दादर या ठिकाणी साहित्यिक महेंद्र चाफे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सम्यक कोकण कला संस्था (रजि.) महाराष्ट्राचे अध्यक्ष मंदार कवाडे, प्रदिप खेत्रे, संतोष गमरे, शरद जाधव आदीं मान्यवरांची उपस्थिती या प्रसंगी होती. जाधव यांनी ग्रामीण भागातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेत मुंबईत घेतले. त्यांना लहानपणा पासूनच गायन, कवी, लेखन अशा विविध कलेची आवड असल्यामुळे त्यांच्या कवितेतून सामाजिक, जनजागृती प्रबोधन अशा कवितेचा महत्त्वपूर्ण भाग झाला. जाधव हे बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ३८५ गोरेगाव अध्यक्ष, खुटिल ग्रामोंत्कर्ष मंडळ मुंबई अध्यक्ष, सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात विविध पदांवर कार्यरत आहेत. त्यांच्या समाजसेवेची नोंद घेऊन याआधीही बहुजन हितवर्धक कला संस्था कोकण रत्न पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांना विविध सामाजिक संघटनांकडून गौरविण्यात आले आहे.

## रुग्णांसाठी मेडिकल बेड भेट



**| नेरळ | प्रतिनिधी |**

मुंबई येथील श्री साई ट्रस्टकडून वेगवगेळ्या प्रकारची मदत केली जाते. या संस्थेच्या माध्यमातून नेरळ गावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांसाठी मदत करण्यात आली. रुग्णांसाठी दोन मेडिकल बेड आणि गाद्या भेट देण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र येथे ग्रामीण व आदिवासी भागातुन आरोग्य उपचार घेण्यासाठी येणाऱ्या पुरुष व महिला रुग्णांसाठी मेडिकल बेड व गादी आवश्यक होती. या कार्यक्रमास अनिता नेगी, राधिका घुले, अंकुश दाभणे, दिलीप घुले, प्रदीप सैंदाणे, सुभाष चव्हाण आणि नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

## वाजेकर विद्यालयात पालक सभा

**उरण :** तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवार, (दि.२७) रोजी इयत्ता अकरावी कला शाखेची विद्यार्थी-शिक्षक-पालक सभा उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पाटोळे यांनी करत, पालक सभेचे महत्त्व, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालक-शिक्षक यांच्यातील संवादाची गरज स्पष्ट केली. दि रयत सेवक को-ऑप बँक लि., साताराचे संचालक प्रा. किशोर पाटील यांनी अभ्यासाचे नियोजन या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी पालकांची जबाबदारी आणि घरातील शैक्षणिक वातावरण यावर भर दिला.

## तळा येथील शाळांना स्मार्ट बोर्ड भेट




**| तळा | प्रतिनिधी |**

दुर्गवीर प्रतिष्ठान आणि ब्लॅक ॲण्ड वीच कंपनीच्या वतीने गो. म. वेदक विद्यामंदिर, ज्युनियर कॉलेज तसेच रायगड जिल्हा परिषद शाळा, तळा यांना अत्याधुनिक स्मार्ट बोर्ड भेट देण्यात आले. डिजिटल शिक्षणाच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल विद्यार्थ्यांसाठी मोठी शैक्षणिक उभारी ठरणार आहे. या कार्यक्रमास तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, मंगेश देशमुख, वैभव चव्हाण, योगेश उपाध्याय, अभिजित तापिसे, संतोष हसुरकर, रवींद्र रावराणे, सागर टक्के, रामजी कदम, सदस्य मंदार गावकर, विठ्ठल केंबळे, कृष्णराम धनवी, भास्कर गोळे, दिलीप ढाकणे,जामकर मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी वैभव चव्हाण यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्मार्ट बोर्डचा शैक्षणिक प्रगतीसाठी अधिकाधिक उपयोग करावा, असे आवाहन केले. दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हसुरकर, सागर टक्के, रामजी कदम यांनी किल्ले संरक्षण, संवर्धन आणि ग्रामीण-डोंगराळ भागातील शाळांना सतत सहकार्य करत असल्याचे सांगितले. याप्रसंगी गो. म. वेदक विद्यामंदिर, ज्युनियर कॉलेज व रा जि प शाळेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## तळा ज्युनियर कॉलेजमध्ये संविधान दिन

**तळा :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारताच्या संविधानाबद्दल जागरूकता वाढावी, तरुण पिढीमध्ये लोकशाही मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्राध्यापक एन. सी. पाटील व प्राध्यापक पी. पी. कसबे यांनी विद्यार्थ्यांसमोर संविधानाचे महत्व विशद केले. केले. महाविद्यालयाच्या वतीने भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. तळा कॉलेज, एस बी आय बँक, बाजारपेठ, बळीचा नाका ते परत महाविद्यालय असा मार्ग घेत विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत संविधान सन्मानाचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवला.

## सुधागडात 'फार्मर कप' शेतकरी प्रशिक्षण यशस्वी

**| पाली | प्रतिनिधी |**



महाराष्ट्र शासन कृषी विभाग व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सत्यमेव जयते फार्मर कप' शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक २९ नोव्हेंबर रोजी सुधागड पाली तालुक्यात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध गावांमधून आलेले शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशिक्षण सत्रात पाणी फाउंडेशनच्या प्रतिनिधी रोशनी जाधव, प्रिया गमरे, निकिता मोकल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खरीप हंगाम २०२६ पासून सुरू होणाऱ्या 'फार्मर कप' स्पर्धेबाबत सविस्तर माहिती दिली. गटशेती ही काळाची गरज असून, गटाच्या माध्यमातून शेतीचा विकास, कमी खर्चात अधिक उत्पादन आणि शाश्वत शेतीच्या दिशेने वाटचाल शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या स्पर्धेसाठी तालुक्यातून निवडण्यात येणाऱ्या १०० शेतकऱ्यांना तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणातून तयार होणारे शेतकरी गट 'फार्मर कप' स्पर्धेत सहभागी होणार आहेत. प्रशिक्षणात निवासी शिबिराची संपूर्ण माहिती देण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, अनेकांनी ऑनलाइन लिंकद्वारे नोंदणीही पूर्ण केली.

प्रशिक्षणाच्या समारोपात तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी शेतकऱ्यांना एकत्र येऊन शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, शेतकऱ्यांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उप कृषी अधिकारी मारुती आढाव यांनी केले. यावेळी सुखदेव कोळपे, वैशाली कोळपे तसेच तालुक्यातील सर्व सहाय्यक कृषी अधिकारी उपस्थित होते.

मंडळ कृषी अधिकारी पाली उदय भोसले यांनी शेतकऱ्यांना 'शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र' महाविस्तार ए.आय. ॲपच्या नोंदणी व वापराबाबत मार्गदर्शन केले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव येथे घरी राहून कामासाठी कपलची आवश्यकता आहे. कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम, गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल. सुविधा :केअरटेकर रूम, किचन काउंटर, टीव्ही. पगार : रु २५,०००/- प्रति महिना. अधिक माहितीसाठी संपर्क : 7875866555, 8408829555
- विकणे आहे - अलिबाग-कुरुळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क :९६२३८४९३४९
- कॉम्प्युटर ग्राफीक्स डियायनर, डिटीपी ऑपरेटर व मशिनवर काम करण्यासाठी मुले/मुली पाहिजेत. स्लॅष ग्राफिक्स, अलिबाग ९८२३६५०५५१
- फिशिंग मच्छिमारी व्यवसायासाठी सेकंडहॅण्ड ३५० ते ४०० पॉवर इंजिन असलेली बोट विकत घेणे आहे मो. ९९२३०३६१५६
- पी.एन.पी. बिल्डींग नं.३ १ला मजला ४०० sqft रूम भाड्याने देणे आहे. डॉक्टर / मेडिकल फॅसेलिटी प्राधान्य - ९७६३३१७७३३.
- वॉन्टेड :- अलिबागमध्ये सकाळी नऊ ते बारा स्वयंपाक करणेसाठी बाई. पाच हजार मो.८५३०३०९७६५
- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- अलिबागमध्ये 2 BHK फ्लॅट विकत हवे. ९९७०४७३९२२.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### विद्यार्थ्यांनी आत्मसात केले धाडसी खेळ | निसर्गातील रोमांच आयुष्यभर लक्षात राहणार

# उंबरखिंडचा उलगडला शौर्याचा इतिहास

**| माणगाव | प्रतिनिधी |**

शौर्य, पराक्रम आणि इतिहासाला उजाळा देणारी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर आणि गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेची शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय पर्वणी ठरली. पाली-खोपोली मार्गावर वसलेल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान पराक्रमाची साक्ष देणाऱ्या समरभूमी उंबरखिंड येथे अलीकडे ही सहल पार पडली.



उंबरखिंडच्या दरीत पाऊल टाकताच विद्यार्थ्यांच्या डोळ्यांसमोर काळाचा पडदा सरकला आणि जणू १६६१ चा ऐतिहासिक दिवस त्यांच्या समोर उभा राहिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी आखलेली रणनिती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. इतिहास फक्त पुस्तकात न वाचता, ज्या भूमीत तो घडला, त्या भूमीत उभे राहण्याचा अतुलनीय रोमांच विद्यार्थ्यांनी अनुभवला. अल्प मावळ्यांनी प्रचंड मोघल सैन्य पराभूत केले. २ फेब्रुवारी १६६१ रोजी खानाचे तीस हजार मोघल सैन्य कोकणावर धडक देण्यासाठी सज्ज झाले होते.

शिवरायांनी आखलेल्या योजनेनुसार मावळ्यांनी उंबरखिंडच्या अरुंद मार्गात मोघल सैन्याला अडकवले आणि काही वेळांतच फौज गोंधळून गेली. विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले की, रणनितीने लढली तर संख्या कधीच अडथळा ठरत नाही. नेताजी पालकर हे उंबरखिंडचे अद्वितीय सेनापती होते. या लढाईत छत्रपती शिवाजी महाराजांसह सर्वात महत्त्वाची भूमिका सरसेनापती नेताजी पालकरांची होती. विद्यार्थ्यांना त्यांच्या पराक्रमाची सविस्तर माहिती देताना शिक्षकांनी सांगितले की, नेताजींच्या धडाडीच्या नेतृत्वामुळे मोघल फौजेला जबर धक्का बसला. त्यांची रणगर्जना, मावळ्यांचा वेग आणि प्राणाची बाजी लावून केलेले अद्भुत साहस विद्यार्थ्यांच्या मनात वीरतेची नवीन परिभाषा कोरून गेले. त्यांचा पराक्रम ऐकताना अनेक विद्यार्थ्यांच्या अंगावर अक्षरशः काटा उभा राहिला. धाडसी खेळांनी आत्मविश्वास वाढवला. ही सहल फक्त इतिहासापुरती मर्यादित नव्हती तर शिवरायांचे धाडस, नेताजी पालकरांचे साहस, मावळ्यांचा त्याग आणि मातृभूमीवरील निष्ठा उभी राहिली. इतिहासाचा जिवंत धडा शौर्याचा अनुभव नेतृत्वाचे शिक्षण निसर्गातील रोमांच आणि आयुष्यभर लक्षात राहणारी प्रेरणा दिली.

> **खेळांमुळे आत्मविश्वास निर्माण**
>
> विद्यार्थ्यांनी तिरंदाजी प्रथमोपचार कौशल्य धाडसी आणि साहसी खेळ यांची ही प्रेरणा दिली. टीमवर्क आणि नेतृत्वगुण वाढवणारे उपक्रम आणि शौर्याचा मनमुराद आनंद घेतला. या खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवे आत्मविश्वास निर्माण झाले आणि शौर्य ही फक्त कथा नसून जीवनातील धडा आहे याची जाणीव झाली. उंबरखिंड सहल प्रेरणादायी इतिहासाचे जिवंत विद्यालय ठरली.

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक सुनिल तुकाराम सावंत व सुपन्ना सुनिल सावंत यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मौजे नागेवाडी, ता.कर्जत जि. रायगड | ५३/५ | १.१९.०० | ०.९४ |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : ०२-१२-२०२५

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु.पो.चिंचवळी, ता. कर्जत
जि. रायगड,
मो.नं.९०४९४८६८०५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बागायत जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १४२५ | बागायत ०-२७-९० | १४.८२ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री.रमाकांत गणपत कासेकर यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबाकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक - ०१/१२/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस - लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## RAJESH KHAIRE
### - ADVOCATE & NOTARY -
### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that I am investigating the title of respective owners namely Pritam Hemant Patil and Vishnu Vitthal patil (hereinafter referred to as the said "Owners") with respect to the immovable property more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the "Property"). The Owners have informed me that own and holds the said Property free from all encumbrances, claims and demands of any nature.

All persons/ entities including an individual, Hindu Undivided Family, a company, banks, financial institutions, non-banking financial institutions, a firm, an association of persons or a body of individuals whether incorporatedor not, lenders and/ or creditors having any benefits, titles, claims, objections, demands or rights or interest in respect of the said Property or any part thereof including in any built-up areas constructed and/ or to be constructed by way of sale, transfer, share, pledge, exchange, mortgage, gift, lien, trust, lease, sub-lease, tenancy, sub-tenancy, assignment, charge, bequest, succession, possession, inheritance, easement, license, occupation, possession, encumbrance, family arrangement/settlement, bequest, sucession, maintenance, trust, decree and/or order of any Court of Law, contracts/ agreements, partnership, any arrangement, memorandum of understandings, letter of intent/heads of terms, development rights, right of way, Lis-pendens, reservation, power of attorney, option, FSI consumption, TDR, right of first refusal, pre-emption or any liability or any commitment or otherwise howsoever or of whatsoever nature are hereby required to intimate the same in writing along with documentary evidence to the undersigned at their address at 3B-21, Kalpataru Riverside Phase 1 Building 3 & 4 CHS Ltd., Off Panvel market Yard Road, Panvel, 410 206, within 14 (fourteen) days benefit, claim, demand and/or objection, if any, of any such persons/entities against the said Owners and/or in respect of the said Property and/ or any part/s thereof shall be treated as waived or abandoned.

**SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO:**
**(Description of the Property)**

ALL THAT piece and parcel of land lying, being and situate at revenue village Parhurpada, Taluka Alibag and District Raigad, and State Maharashtra having the following description:

| Survey No. | Area in Hectares | Assessment (Rs.Ps.) | Name of owner | Boundaries |
|---|---|---|---|---|
| 329 | 00-83-70 | 22.19 | Pritam Hemant Patil and Vishnu Vitthal Patil | On or towards the East: 332/337<br>On or towards the West: 326/328<br>On or towards the North: 325<br>On or towards the South:330/331 |

Sd/-
**R. Khaire, Advocate**
**Date- December 2025**
Office: 3B-21, Kalpataru Riverside Par CHS, Takka, Panvel, Tal. Panvel, Dist. Raigad, Mo. 9920609888.

## नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिल सौ. सुरेखा जगदीश पाटील, रा.प्लॉट नंबर २० सेक्टर -२४ तुर्भे नवी मुंबई यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - शिलार, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.न | हिन | क्षेत्र हे आर प्रति | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| रमेश खंडू दळवी | १२ | १ | ०२-७८-००<br>पो.ख ००-४०-००<br>एकूण क्षेत्रफळ<br>०३-१८-०० हे. आर प्रति यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे<br>०२-९५-०० हे आर प्रति विक्री क्षेत्र | १ रू ५० |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता.०१/१२/२०२५

सही /-
**ॲड सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता- नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत - रायगड मो. नं. ९८८११३२२४८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे भेलीव, ता.-सुधागड, जि.-रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | ग.क्र./भू.क्र | एकूण क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| कौशिक मधुसूदन संपत | १६४/५ (प्लॉट.नं.८५) | ला.योग्य ०-१६-७०<br>पो.ख.०-०५-७०<br>एकूण.०-२२-४० | ०.०७ |

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बददल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. सोनाली गंगाधरे शहासने**
''सीता-सदन'' वाकण, पो.- पाटणसई,
ता.-रोहा, जि.रायगड, ४०२१०६
मो. क्र. ७७७५८९०४५५

## जाहीर सूचना

याद्वारे आम जनतेला सूचित करण्यात येते की **श्री. समीर ठुकराल** राहणार जोर बाग लेन, नवी दिल्ली, दिल्ली - ११०००३ (**टीप : अशिलांना पत्ता निश्चित करावयाचा आहे**) हे १) खालील प्रथम अनुसूचीमध्ये भाग ए ते भाग एफ मध्ये विस्तृतपणे विवरणीत गाव नांदगाव, उप जिल्हा मुरूड, जिल्हा रायगड येथील व २) द्वितीय अनुसूचीमध्ये भाग ए ते भाग ई मध्ये विस्तृतपणे विवरणीत गाव माझगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड येथील शेतजमिन असलेल्या विविध भाग व भूखंडांचे (**सदर मालमत्ता**) कायदेशीर मालक आहेत. श्री. समीर ठुकराल यांनी आमच्या अशिलांना सदर मालमत्तांची विक्री, हस्तांतरण व अभिहस्तांकन करण्याचे मान्य केले आहे.

अशा सर्व त्या व्यक्ती ज्यांचा सदरील मालमत्तेमध्ये अथवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, असाइनमेंट, भेट, मृत्यूपश्चात वारसा, भाडेकरार, उप-भाडेकरार, वहिवाट, उप-वहिवाट, लिव्ह अँड लायसन्स, निषेधाज्ञा, गहाण, प्रभार, न्यास, उत्तराधिकार, वारसा वा कंत्राट वा सामंजस्य करार, सुविधाधिकार, हक्क-मार्ग, ताबा, कब्जा, आरक्षण, विकास हक्क, एफएसआय उपभोग, सुविधाजनक हक्क, स्थायी व शाश्वत हक्क मार्ग आदी किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास त्यांनी

त्या संदर्भातील माहिती लेखी स्वरूपात, आपल्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह, निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे, मेसर्स पूर्णानंद ॲन्ड कं., वकील, फोर्ट चेंबर्स, सी, २ रा मजला, टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई ४०० ०२३ येथे किंवा ई मेलच्या माध्यमातून <harshil.parekhpurnanand.co.in येथे, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १० दिवसांत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आमचे अशील हे असे हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा वा मागणी अधित्यागित व परित्यागित आहेत असे गृहीत धरतील.

**प्रथम अनुसूची**

**भाग ए :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. १२९, मोजमापित ००एच - २८ए - ०० चौ. मी., गाव नांदगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**भाग बी :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. १७४, मोजमापित ०१एच - ५३ए - ०० चौ. मी., गाव नांदगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**भाग सी :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. १७६, मोजमापित ००एच - ९९ए - ०० चौ. मी., गाव नांदगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**भाग डी :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. १८२, मोजमापित ०१ एच - १५ए - ०० चौ. मी., गाव नांदगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**भाग ई :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. १८४, मोजमापित ०१एच - ०९ए - ०० चौ. मी., गाव नांदगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**भाग एफ :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. १८८, मोजमापित ००एच - ८५ए - ०० चौ. मी., गाव नांदगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**द्वितीय अनुसूची**

**भाग ए :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. २७०बी, मोजमापित ०१एच - ४७ए - ०० चौ. मी., गाव माझगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**भाग बी :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. २८१, मोजमापित ०१एच - ४८ए - ०० चौ. मी., गाव माझगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**भाग सी :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. २८५, मोजमापित ०१एच - ६६ए - ०० चौ. मी., गाव माझगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**भाग डी :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. २८९, मोजमापित ०१एच - ३१ए - ०० चौ. मी., गाव माझगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

**भाग ई :** पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. २९०, मोजमापित ०१एच - ९१ए - ०० चौ. मी., गाव माझगाव, उपजिल्हा मुरूड, जिल्हा रायगड.

दिनांक : ३० नोव्हेंबर, २०२५

**मे. पूर्णानंद ॲन्ड कं. करिता**
**भागीदार**
**वकील व सॉलिसिटर्स**
६५, टॅमरिंड लेन, फोर्ट चेंबर्स, सी विंग, २ रा मजला,
फोर्ट, मुंबई ४०० ०२३. ई मेल : harshil.parekh@purnanand.co.in

दिनांक :- ०१/१२/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे -नाडसूर ता.सुधागड जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-नाडसूर ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र.हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्रीमती.शिवाजी कृष्णा म्हात्रे | ५१३ | ०-४३-३० | ४-०६ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण पाली-सुधागड
दिनांक-०१/१२/२०२५

सही /-
**श्री.राहुल जे.भंडारी**
ॲडव्होकेट
रा.पाली ता.सुधागड जि.रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## जाहीर नोटीशीद्वारे हरकत

मी श्री.सुधाकर नारायण म्हात्रे सर्व लोकांस या जाहिर नोटिसद्वारे कळवितो की, मौजे आंबेपूर, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मी श्री. कमळाकर शंकर जाधव वगैरे १७ हयांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले होते व त्याबाबतचा साठेकरार देखील केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन : तलाठी सजा चरी हद्दीतील मौजे आंबेपूर, ता. अलिबाग येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ११०/१, क्षेत्र १-३८-४० हे.आर, पो.ख. ०-१४-९० हे. आर एकुण क्षेत्र १-५३-३० हे. आर आकार १९.५० रू. पैसे ही मिळकत सदर जाहिर नोटिसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीसंदर्भात मी विद्यमान मालकांकडून सदर मिळकत कायमस्वरूपी खरेदीखताने घेण्याचे ठरविले होते व त्याबाबतचा साठेकरार केला आहे. तसेच कमलाकर शंकर जाधव यांच्या नावे बयाणा म्हणून रक्कम रूपये २७,००,०००/- भारतीय स्टेट बॅक ऑफ इंडिया या बँकेचा चेक देखील अदा केला आहे. त्यानंतर आता मला खात्रीशीररित्या समजले आहे की, कमलाकर शंकर जाधव हे वर नमुद मिळकतीचा अन्य त्रयस्त इसमासोबत खरेदी विक्री व्यवहार करत असल्याचे समजले आहे. त्यामुळे मी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

तरी वर नमुद मिळकतीसंदर्भात कुणीही खरेदी-विक्री व्यवहार केल्यास तो प्रामाणिक खरेदीदार ठरणार नाही. तसेच मी कमलाकर शंकर जाधव वगैरे यांच्याविरूद्ध दिवाणी न्यायालयात दाद मागीतली आहे.

अलिबाग,
दि. ०१/१२/२०२५

सही/-
**श्री.सुधाकर नारायण म्हात्रे**

## पनवेल महानगरपालिका
### अग्निशमन विभाग
### दरपत्रके मागविण्यास सुचना

पनवेल महानगरपालिकेस सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता निविदापत्रकांत नमूद केलेनुसार, पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता १२० नग ४ kg ABC Type Fire Extinguisher खरेदी करणे करीता पात्र व इच्छुक संस्था/नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्या कडून सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र व कामाची तपशीलवार माहिती www.panvelcorporation.com या दिनांक ०२-१२-२०२५ रोजी पासून संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र./पमपा/अग्नि/२६२५/प्र.क्र./२२०३/२०२५
दिनांक :-०१-१२-२०२५

**सही/-**
**(कैलास गावडे)**
**उपआयुक्त (मुख्यालय । )**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस
**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र.२३४/२०२५

बाळाराम आत्माराम धसाडे — अर्जदार
मु.भांदरे माणगांव जि. रायगड

**विरुद्ध**

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
भांदरे, ग्रामपंचायत मांगरुळ,
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ.बाळाराम आत्माराम धसाडे यांचा जन्म/मृत्यू मौजे भांदरे ता..माणगाव, जि. रायगड याठिकाणी दि १७/०३/१९८९ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि. ६/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू भांदरे येथे दि.१७/०३/१९८९ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम,कलम १९६९ चे कलम १३(३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि.१७/०३/१९८९ रोजी भांदरे ता. माणगाव जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरुन आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : ०१/१२/२०२५

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक दिपक बाळाराम भगत, रा. पोयनाड, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेली आहेत. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| पोयनाड ता.अलिबाग जि.रायगड | ६५/१/११ | एकूण २-४२-०० | २४-२० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्युपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १.१२.२०२५

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्यासमोर अलिबाग
जि. रायगड मो.नं.९८९००७९३०२

## तहसिलदार सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.१२२०/२०२५

श्री. राहुल गौतम सोनावळे,
रा. कुंभारशेत पो.पाली — वादी
ता. सुधागड जि. रायगड

विरुद्ध

मुख्याधिकारी, नगरपंचायत पाली
ता. सुधागड.जि.रायगड — प्रतिवादी

जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे
जन्म-मृत्युबाबत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्री. राहुल गौतम सोनावळे, रा. कुंभारशेत पो.पाली ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांचे स्वतःचा जन्म दि.२२/१२/१९८२ रोजी मौजे पाली ता.सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत नगरपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर राहुल गौतम सोनावळे यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- २६/११/२०२५

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे भेलीव, ता.-सुधागड, जि.-रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | ग.क्र./भू.क्र | एकूण क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| जगन्नाथ अंम्ब्राणी | १६४/अ/१९ (प्लॉट नं.८६) | ला.योग्य ०-२३-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण.०-२३-०० | ०.६२ |

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बददल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही /-
**ॲड. सोनाली गंगाधरे शहासने**
''सीता-सदन'' वाकण, पो.- पाटणसई,
ता.- रोहा, जि. रायगड, ४०२१०६
मो.क्र.७७७५८९०४५५

## जाहीर निविदा
**इमारतीच्या पुर्नविकासासाठी निविदा मागविणेबाबत नोटीस**

पूजा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था म. सर्व्हे क्रमांक २७, हिस्सा क्रमांक २, अंतिम भूखंड क्रमांक ६४, पूजा नगर जुना पोस्टाचा मार्ग, पेण. ता.पेण जिल्हा रायगड, या गृहनिर्माण सहकारी संस्थेने आपल्या इमारतीचा पुर्नविकासाचा निर्णय घेतला असून संस्थेने नियुक्त केलेल्या वास्तुविशारदानी/ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यानी याबाबतचा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रकल्प अहवालाची संस्थेने चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे दिनांक २/१२/२०२५ ते दिनांक ०५/१२/२०२५ या कालावधीत सकाळी १०:०० ते दुपारी ३:०० या वेळेत या इमारतीच्या पुर्नविकासासाठी इच्छुक विकासक यांना पाहणी करता येईल, व त्याआधारे पुर्नविकासासाठी इच्छुक विकासक यांचेकडून दिनांक ०५/१२/२०२५ ते दिनांक ०८/१२/२०२५ या कालावधीत सकाळी १०:०० ते दुपारी ३:०० या वेळेत आपल्या निविदा संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांचेकडे जमा कराव्यात. तसेच निविदा हया कमीत कमी रकमेला प्राधान्य अशा स्वरुपाच्या नसून सभासदांना योग्य वाटेल त्या विकासकाच्या निविदेचा निवड सर्वसाधारण सभेत करण्यात येईल. निविदा मंजूर किंवा नामंजूर करणेबाबतचा अधिकार सर्वस्वी संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा असेल, त्याबाबत कोणतेही कारण देण्यास संस्था बांधील नाही.

सही — **चेअरमन**
सही — **सेक्रेटरी**
**पूजा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मार्यादित.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेणेच्या ठरविलेले आहे.

सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | मौजे | गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | नागाव | २१८३/२ | ०-१६-६०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-१७-६० | ४.८१ |

वर नमुद वर्णनाच्या मिळकती या निर्वेध व निंजोखीम असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना करून दिलेली आहे. या गोष्टीची पडताळणी करणेकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेत येत आहे.

तरी सर्व लोकांस असे कळिवणेत येते की, वर नमुद केलेल्या मिळकतीमध्ये विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचेही साठेकरार खरेदीखत दान, लिन, बक्षीसपत्र, वहीवाट वगैरे अन्य कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यासंबंधी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत खाली सही करणार यांचेकडे पंधरा दिवसांचे आत आणून द्यावी. सदर विहीत मुदतीत जर कुणाचीही कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे तसेच मुळ मालकांकडे न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व निंजोखीम आहे असे समजून आमचे अशिल सदर विद्यमान मालकांबरोबर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील अशा परिस्थीतीत मग मागाहून येणारी कोणाचीही कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

अलिबाग
दि. ०१/१२/२०२५

**श्री. संतोष एकनाथ म्हात्रे**
ॲडव्होकेट
'देवगिरी', कामत आळी,
अलिबाग-रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी, विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतींचे विद्यमान मालक यांच्यामध्ये बोलणी करण्यात आलेली आहेत मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर | आकार रू.पैसे | विद्यमान मालक |
|---|---|---|---|---|
| काळोशी ता.अलिबाग, | ३/८ | ०-२९-३०<br>पो.ख.०-०४-००<br>एकुण क्षेत्र ०-३३-३० | ६.०१ | श्री.दत्तात्रेय उर्फ दत्तू महादेव कनगुटकर, |
| काळोशी ता.अलिबाग, | ५/१ | ०-१४-७०<br>पो.ख.०-००-५०<br>एकुण क्षेत्र ०-१५-२० | ०.६६ | |
| काळोशी ता.अलिबाग, | ५/३ | ०-४१-५०<br>पो.ख.०-०२-००<br>एकूण क्षेत्र ०-४३-५० | २.०६ | १)सविता लक्ष्मण जाधव,<br>२)सुजाता नारायण राऊत,<br>३)सिमा संजय करोडेकर,<br>४)आशा सुनिल उर्फ सुरेंद्र मयेकर,<br>५)निलम नामदेव रांजणकर, |

संदर्भित मिळकती पुर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०२/१२/२०२५

**ॲड. किशोर म.हजारे**
बी.कॉम.एल.एल.बी.
००१, वैद्यबाग को.ऑप
हौ.सो.कामत आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

पहिला एकदिवसीय सामना | विराट कोहलीचे शतक

# भारताचा दक्षिण अफ्रिकेवर विजय



। रांची । वृत्तसंस्था ।

रांचीतील पहिल्या वनडे साम्न्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला १७ धावांनी पराभूत केले. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. विराट कोहली, कुलदीप यादव आणि हर्षित राणा यांचे विजयात महत्त्वाचे योगदान राहिले.

या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेसमोर ३५० धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला ४९.२ षटकात सर्वबाद ३३२ धावा करता आल्या. दक्षिण आफ्रिकेकडून मार्को यान्सिन, मॅथ्यू ब्रिट्झके आणि कॉर्बिन बॉश यांनी झुंज दिली.

दक्षिण आफ्रिकेकडून रायन रिकल्टन आणि एडेन मार्करम यांनी डावाची सुरुवात केली होती. पण हर्षित राणाने दुसऱ्याच षटकात दक्षिण आफ्रिकेला दोन मोठे धक्के दिले. त्याने पहिल्या चेंडूवर रिकल्टनला शून्यावर मागे धाडले. त्यानंतर तिसऱ्याच चेंडूवर अनुभवी क्विंटन डी कॉकलाही त्याने शून्यावर बाद केले. त्यानंतर मार्करमही फार काळ टिकू शकला नाही. त्याला अर्शदीप सिंगने यष्टीरक्षक केएल राहुलच्या हातून ७ धावांवर झेलबाद केले. त्यामुळे ११ धावांवर ३ विकेट्स अशी बिकट अवस्था दक्षिण आफ्रिकेची झाली होती.मात्र नंतर मॅथ्यू ब्रिट्झके आणि टोनी डी झोर्झी यांनी डाव सावरताना ६६ धावांची भागीदारी केली. त्यांची भागीदारी रंगत असताना झोर्झीला १५ व्या षटकात कुलदीप यादवने ३९ धावांवर बाद केले.

डेवाल्ड ब्रेव्हिसने आक्रमक खेळत ब्रिट्झकेची साथ दिली. त्यांच्यातही ५३ धावांची भागीदारी झाल्याने दक्षिण आफ्रिकेच्या डावाला स्थिरता मिळाली होती. ब्रव्हिसला २२ व्या षटकात हर्षित राणाने बाद केले. त्याचा २८ चेंडूत ३७ धावांवर ऋतुराज गायकवाडने चांगला झेल घेतला. तो बाद झाल्यावर यान्सिनने आक्रमक फलंदाजी केली. दुसरी बाजू ब्रिट्झके सावरत असताना यान्सिनने मोठे फटके खेळले. या दोघांनी ६ व्या विकेटसाठी ९७ धावांची भागीदारी केली, ज्यात यान्सिनच्या ७० धावांचे योगदान होते. या भागीदारीदरम्यान ब्रिट्झकेचेही अर्धशतक झाले. अखेर कुलदीप यादवनेच ब्रेकथ्रू मिळवून दिला. त्याने रवींद्र जडेजाच्या हातून यान्सिनला ३४ व्या षटकात बाद केले. यान्सिनने ३९ चेंडूत ८ चौकार आणि ३ षटाकारांसह ७० धावांची खेळी केली.

तो बाद झाल्यानंतर याच षटकात ब्रिट्झकेलाही कुलदीपने विराट कोहलीच्य हातून झेलबाद केले. ब्रिट्झकेने ८० चेंडूत ७२ धावांची खेळी केली. तरी नंतर कॉर्बिन बॉश आणि प्रेनेलन सुब्रयेन यांनी डाव पुढे नेला. मात्र सुब्रयनलाही १७ धावांवर कुलगीपने ४० व्या षटकात बाद केले.

पण तरी नांद्र बर्गरने कॉर्बिन बॉशची साथ देत संघाला लक्ष्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न केला. मात्र अर्शदीपने नांद्रे बर्गरला १७ धावांवर बाद केले. तरी बॉश दक्षिण आफ्रिकेला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला होता. त्याने अर्धशतकही पूर्ण केले होते. पण अखेरच्या षटकात १८ धावांची गरत असाताना दुसऱ्या चेंडूवर प्रसिद्ध कृष्णाने कॉर्बिन बॉशलाच रोहित शर्माच्या हातून झेलबाद करत दक्षिण आफ्रिकेचा डाव संपवला. बॉश ५१ चेंडूत ६७ धावांवर बाद झाला.भारताकडून कुलदीप यादवने शानदार गोलंदाजी करत ४ विकेट्स घेतल्या. तसेच हर्षित राणाने ३ विकेट्स घेतल्या. अर्शदीप सिंगने २ विकेट्स घेतल्या, तर प्रसिद्ध कृष्णाने १ विकेट घेतली.

दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. भारताने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ८ बाद ३४९ धावा केल्या. भारताकडून विराट कोहलीने १३५ धावांची खेळी केली. त्याने रोहित शर्मासोबत १३६ धावांची भागीदारी केली. रोहितनेही ५१ चेंडूत ५७ धावांची खेळी केली. केएल राहुलनेही ६० धावांची खेळी केली, तर रवींद्र जडेजानेही ३२ धावांची छोटेखानी पण महत्त्वपूर्ण खेळी केली.

## खेलो इंडियाच्या सायकलिंग ट्रॅकवर महाराष्ट्राची पदक अष्टमी



। जयपूर । वृत्तसंस्था ।

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील सायकलिंग ट्रॅकआज महाराष्ट्राच्या जयघोषाने दुमदुमला. पुणे विद्यापीठाच्या सिध्दी शिर्के, मंगेश ताकमोगे यांनी सुवर्णपदके जिंकून दिवस गाजविला. आदिती डोंगरे, सिध्देश, पाटील, मंथन लाटे यांनी रौप्य तर कोल्हापूरच्या योगेश्वरी कदम १, सायली आंरडेने २ कांस्य पदक जिंकून महाराष्ट्रासाठी पदकाची अष्टमी साजरी केली.

सवाई मानसिंग क्रीडा संकुलातील सायकलिंग ट्रॅकवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खेळाडूंनी सायकलिंग स्पर्धेची सुवर्ण सांगता केली. २० कि.मी पॉईंट शर्यतीत पुणे विद्यापीठाच्या सिध्दी शिर्केने आपली हुकूमत गाजवली. १९ वर्षीय सिध्दीने ६५ गुणांची कमाई करीत सुवर्णयश संपादले. लव्हली विद्यापीठाच्या रिंकु भानूने ३८ गुणांसह रौप्य तर कोल्हापूर विद्यापीठाच्या योगेश्वरी कदमने २७ गुणांची कमाई करीत कांस्य पदकावर नाव कोरले. महिन्या भरापूर्वी झालेल्या हाताच्या दुखापतीवर मात करीत सिध्दीने खेलो इंडियातील पहिले पदक जिंकण्याचा करिश्मा घडविला. पुरूषांच्या ५ फेऱ्यांच्या इलीट शर्यतीत पुणे विद्यापीठाने मक्तेदारी प्रस्थापित केली. मंगेश ताकमोगेने सुवर्ण तर मंथन लाटे रौप्यपदकावर नाव कोरले. मंगेश व मंथनने सुरूवातीपासून आघाडी घेत पदकाची कमाई केली. लव्हली विद्यापीठाच्या अजय बिश्नोईला कांस्य पदकावर समाधान मानावे लागले.

## नि|व|ड|क

### आयोजनासाठी पाच हजार कोटी खर्च अपेक्षित

**नवी दिल्ली :** भारतात अहमदाबाद येथे २०३० मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाचा खर्च अंदाजे तीन ते पाच हजार कोटी रुपये असू शकतो, असा अंदाज आयोजन समितीने व्यक्त केला आहे. स्पर्धेच्या नियोजनात सहभागी असलेल्या एका विश्वासार्ह सूत्राने ही माहिती दिली. सध्या स्पर्धेच्या आयोजनासाठी एकूण खर्च निश्चित करण्यासाठी अंदाज घेणे सुरू आहे. यापूर्वी २०१० मध्ये नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेवर वारेमाप खर्च करण्यात आला होता. त्यामुळे आयोजनपातळीवर अनेक वाद निर्माण झाले होते. त्यामुळे या सर्व घटनांचा अभ्यास करून या वेळी कामकाजाचा खर्च तीन ते पाच हजार कोटी इतका ठेवण्यात येणार आहे. अर्थात, यामध्ये पायाभूत सुविधांच्या बांधकामासाठी लागणाऱ्या निधीचा समावेश नाही. यासाठी येणाऱ्या खर्चाचा काही भाग हा शहर विकास विभाग हाताळणार असल्याची माहितीही या सूत्राने दिली.पायाभूत सुविधा अंतर्गत होणाऱ्या पायाभूत बांधकामाचा उपयोग खेळाच्या पलीकडे जाऊन केला जाणार आहे. यामुळेच हा खर्च खेळावर होणाऱ्या खर्चात मोजला जाणार नाही. स्पर्धेसाठी नेमका किती खर्च येईल याचा अंदाज घेण्यासाठी आम्हाला काही वेळ लागेल. यापूर्वीच्या नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेवरील खर्च नियोजित अंदाजापेक्षा अधिक झाल्यामुळे सरकारी तिजोरीवर ७० हजार कोटी रुपयांचा ताण पडला होता.

### श्रीकांत, त्रिसा-गायत्री अंतिम फेरीत

**लखनौ :** माजी विजेता किदाम्बी श्रीकांतने आणि गतविजेत्या महिला दुहेरीच्या जोडीतील त्रिसा जॉली-गायत्री गोपीचंद यांनी येथे सुरू असलेल्या सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरी आणि महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. २०१६ मध्ये विजेतेपद पटकावलेल्या ३२ वर्षीय श्रीकांतने २०२३ चा राष्ट्रीय विजेता व आपलाच राष्ट्रीय सहकारी मिथुन मंजुनाथचे कडवे आव्हान २१-१५, १९-२१, २१-१३ असे मोडीत काढत थरारक उपांत्य सामना जिंकला. या मोसमात मलेशिया मास्टर्सच्या अंतिम फेरीत पोहोचलेला आणि २०२१ विश्व अजिंक्यपद स्पर्धेचा रौप्यपदक विजेता श्रीकांत आता अंतिम फेरीत हाँगकाँगच्या जेसन गुनावान व जपानच्या मिनोरू कोगा यांच्यातील जेत्याशी भिडणार आहे. तत्पूर्वी, जागतिक क्रमवारीत १४ व्या स्थानी असलेल्या त्रिसा-गायत्रीने उत्कृष्ट खेळ साकारत महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत मलेशियाच्या ओंग शिन यी आणि कारमेन टिंग यांचा २१-११, २१-१५ असा सहज पराभव केला. आता रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात त्यांच्यासमोर जपानच्या आठव्या मानांकित काहो ओसावा आणि माई तनाबे यांचे आव्हान असेल.दरम्यान, भारताचे महिला एकेरीतील आव्हान उपांत्य फेरीत संपुष्टात आले.

### कुलदीपने मोडला शेन वॉर्नचा विक्रम

**नवी दिल्ली :**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील रांचीमध्ये झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात टीम इंडियाने १७ धावांनी विजय मिळवला. कुलदीप यादवने आपल्या उत्कृष्ट फिरकीच्या गोलंदाजीवर सामना भारताच्या बाजूने फिरवला. कुलदीपने ४ विकेट्स घेत दिग्गज फिरकीपटू शेन वॉर्नचा वर्ल्ड रेकॉर्ड मोडला.कुलदीप यादवने फक्त ३ चेंडूत ब्रिट्झके आणि यान्सनला बाद केलं आणि सामना पालटला. या सामन्यात कुलदीप यादवने १० षटकांत ६८ धावा देत ४ बळी घेतले आणि तो भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. या चार बळींसह कुलदीपने शेन वॉर्न, अँडरसन आणि स्टुअर्ट ब्रॉड सारख्या महान गोलंदाजांनाही मागे टाकलं. कुलदीपने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याच्या कारकिर्दीत चौथ्यांदा ४ विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे. यापूर्वी, त्याने २०१८ मध्ये केपटाऊन आणि गकेर्भा येथे झालेल्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध चार विकेट घेतल्या होत्या आणि २०२२ मध्ये दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियममध्ये झालेल्या सामन्यात ४ विकेट्स घेण्याचा विक्रम केला होता. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध फिरकी गोलंदाजाने केलेला हा सर्वोत्कृष्ट विक्रम आहे, कारण कुलदीपने शेन वॉर्न आणि युजवेंद्र चहल यांच्याशी बरोबरी केलेला विश्वविक्रम आता मोडला आहे. शेन वॉर्नने दक्षिण आफ्रिकेविरूद्ध तीन वेळा ४ विकेट्स घेण्याचा पराक्रम केला होता आणि आता कुलदीपने त्याला मागे टाकत पहिलं स्थान गाठले आहे.

आरडीसीए आयोजित चौदा वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धा

## रोशन अकॅडमीचा अंतिम सामन्यासाठी प्रवेश



। पोयनाड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या चौदा वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रोशन क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाने उपांत्य फेरीच्या झालेल्या सामन्यात प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघावर एकतर्फी विजय प्राप्त करत अंतिम फेरीत प्रवेश निश्चित केला आहे.

रोशन क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाचा अंतिम सामना जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाबरोबर लवकरच होणार आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघाचा डाव ३५.४ षटकात सर्व गडी बाद अवघ्या ३९ धावसंखेवर संपला, त्यामध्ये यजुर्व घरतच्या १३ धावा वगळता कोणताही खेळाडू दुहेरी अंकातील धावसंख्या गाठू शकला नाही.

रोशन क्रिकेट अकॅडमी कडून निखिल अहिरवाल यांनी सर्वाधिक ४ समर्थ यादव ३ तर आर्यन गाडे यांनी २ फलंदाज बाद केले.अवघ्या ४० धावांचे लक्ष घेऊन फलंदाजीसाठी आलेल्या रोशन क्रिकेट अकॅडमी संघाने १२.५ षटकात २ गडी गमावत ४० धावांचे लक्ष पूर्ण केले. त्यामध्ये मीत पाटील यांनी सर्वाधिक नाबाद १४ धावा काढल्या.पनवेल संघाकडून अधिराज जाधव यांनी १ फलंदाज बाद केला. प्रशिक्षक रोशन अडे यांनी केलेल्या कामगिरीवर आनंद व्यक्त करत अंतिम सामन्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### भारताकडून ओमानचा धुव्वा

। चेन्नई । वृत्तसंस्था ।

ज्युनिअर हॉकी विश्वचषकाच्या गट ब सामन्यात भारताने ओमानचा १७-० असा मोठा पराभव करत स्पर्धेत विजयी सलामी दिली. भारताच्या आक्रमणापुढे ओमानचा संघ निष्प्रभ ठरला. भारताकडून दिलराज सिंगने सर्वाधिक चार गोल केले, तर मनमित सिंग आणि अर्शदीप सिंग यांनी हॅट्ट्रिक नोंदवून विजयात मोलाचा वाटा उचलला. चेन्नई येथे झालेल्या या सामन्यात भारतीय खेळाडूंनी सुरुवातीपासूनच ओमानच्या बचाव फळीला संधी दिली नाही. मैदानावर गोलचा अक्षरशः पाऊस पडला. भारताची पेनल्टी कॉर्नरवर गोल करण्याची क्षमता बऱ्याच काळापासून चिंतेचा विषय राहिली आहे.

### हर्ष धनावडे 'मावळी मंडळ श्री'



। ठाणे । प्रतिनिधी ।

ठाणे श्री मावळी मंडळ ठाणे संस्थेने शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित ३६वी जिल्हास्तरीय व अंतर्गत शरीरसौष्ठव श्री मावळी मंडळ श्री स्पर्धा संस्थेच्या क्रीडांगणात मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत श्री मावळी मंडळ श्री किताब हर्ष दिगंबर धनावडे यांने पटकविला.

जिल्हास्तरीय श्री मावळी मंडळ श्री किताब ऍप्स स्टुडिओ जिम ठाणे या व्यायाम शाळेच्या हृषीकेश हरिदास शामगीर याने पटकविला. तर, या स्पर्धेतील सांघिक विजेतेपद अपोलो फिटनेस माणकोली आणि सांघिक उपविजेतेपद प्लॅनेट फिटनेस डोंबिवली यांना मिळाले.

या स्पर्धेमध्ये अंतर्गत व जिल्हास्तरीय मिळून एकूण १७ व ७८ अशा ९५ स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे स्पर्धेचे उद्‌घाटन संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे यांनी केले. अंतर्गत व जिल्हास्तरीय किताब विजेत्यांना बक्षिस देण्यासाठी प्रमुख पाहुणे दत्तात्रय यादव, विशेष अतिथी सचिन सूर्यकांत मोरे हे उपस्थित होते.

कुमार- कुमारी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

## ठाणे ग्रामीण कुमार व पालघर संघ कुमारी विभागात विजेता ठरला



। पुणे । प्रतिनिधी ।

ठाणे ग्रामीण व पालघर या संघानी अनुक्रमे ५२व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कुमार व कुमारी गटाचे विजेतेपद पटकाविले.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएसशनच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमान पदाखाली पिंपरी चिंचवड बोपखेल येथील दिवंगत श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे व राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने ही आमदार चषक कबड्डी स्पर्धा पार पडली.

स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी रात्री उशीरा झालेल्या मुलांच्या शेवटच्या मिनिटापर्यंच अत्यंत रोम हर्षक झालेल्या अंतिम सामन्यात ठाणे ग्रामीण संघाने अहमदनगरचा संघाचा ३९-३७ अशा गुण फरकाने पराभव करून स्व. प्रभाकर नागो पाटील फिरता चषका बरोबर आमदार चषक पटकाविला.

मध्यंतरला ठाणे ग्रामीण १६-२२असा ६गुणांनी पिछाडीवर होता. मात्र मध्यंतरानंतर जीतसिंग सैनी व स्मित पाटील यांनी जोरदार आक्रमण करीत अहमदनगरच्या अभिजित साळुंखेचा व सार्थक शिंदेचा बचाव भेदला. त्यामुळे मध्यंतरानंतर सामना ठाणे ग्रामीणच्या बाजुला झुकविण्यात त्यांना यश आले. ठाणे ग्रामीणच्या समन हरिजन याने सुरेख पकडी घेत आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात हात भार लावला.

कुमारी विभागात पालघरच्या संजना भोईर व हनी सोलमुत्तू यांच्या वेगवान चढाया व काजल भोईरने केलेल्या पकडींमुळे पिंपरी चिंचवड संघाचा ५३- ४५ असा पराभव करीत स्व. चंदन सदाशिव पांडे फिरता चषक व आमदार चषक पहिल्यांदा पटकाविला. मध्यंतराला पालघर संघाक्डे ३१-२० अशी आघाडी होती. सामन्याच्या पुर्वार्धातच संजना भोईर हिने जबरदस्त आक्रमण करीत पिंपरी चिंचवड संघावर दोन लोन लावत आपले ईरादे स्पष्ट केले. तीने निडरपणे खेळ करीत पिंपरी चिंचवडच्या सिध्दी गायकवाड व नम्रता सावंत यांचा बचाव भेदत आपल्या संघाला चांगली आघाडी मिळवून दिली. ही आघाडी उत्तरार्धात ही कायम राखत हा सामना जिंकला. पिंपरी चिंचवडच्या संतोषी थोरवे व किर्ती कडगंची यांनी वारंवार पालघरचा बचाब भेदण्याचा प्रयत्न केला, मात्र या प्रयत्नात त्यांना यश न आल्याने त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. पिंपरी चिंचवडच्या सिध्दी गायकवाडने पकडी घेतल्या. तत्पुर्वा झालेल्या कुमारी विभागात उपांत्य सामन्यात पालघर संघाने सांगली संघाचा ४४-२३ असा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला होता. तर पिंपरी चिंचवड संघाने गतविजेत्या पुणे ग्रामीण संघाचा ४८-४३ असा अनपेक्षित पराभव केला.

कुमार विभागात अहमदनगर संघाने परभणी संघाचा ५१-५० असा अवघ्या एक गुणांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. तर ठाणे ग्रामीण संघाने पुणे ग्रामीण संघाचा ३७-३६ असा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला.स्पर्धेचे पारितोषिक वितरण विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी स्पर्धा आयोजक शशिकांत घुले, दिनेश धावडे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे खजिनदार मंगल पांडे,मालोजी भोसले, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष दत्तात्रय कळमकर, हिरीबाई घुले, निलेश पांढरकर, छत्रपती पुरस्कार प्राप्त राजू घुले, राकेश भाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी आदी उपस्थित होते.

बीसीसीआयची तातडीची मीटिंग | वरीष्ठ खेळाडूंची नाराजी करणार दूर?

## गंभीर-आगरकरवर टांगती तलवार?

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

बुधवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यापूर्वी बीसीसीआयने भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, निवड समिती प्रमुख अजित आगरकर आणि इतर अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे, ज्यामध्ये तातडीच्या बाबींवर चर्चा केली जाईल. टीम इंडियाचे प्रमुख खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या भविष्याबाबत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान हे घडले आहे.



दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात दोघांनीही शानदार खेळी केल्यामुळे भारताला विजय मिळाला. कोहली आणि रोहित अलिकडेच एकदिवसीय सामन्यांमध्ये सातत्याने चांगली फलंदाजी करत आहेत.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया, संयुक्त सचिव प्रभतेज सिंग भाटिया, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर हे बैठकीला उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. बीसीसीआयचे नवनियुक्त अध्यक्ष मिथुन मन्हास उपस्थित राहतील की नाही याची पुष्टी अहवालात केलेली नाही. ही बैठक सामन्याच्या दिवशी नियोजित असल्याने, कोहली, रोहित आणि इतर वरिष्ठ खेळाडूंना आमंत्रित केले जाण्याची शक्यता खूपच कमी दिसते.

बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, ही बैठक संघात निवड सुसंगतता सुनिश्चित करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे, तसेच दीर्घकालीन विकास आणि एकूण संघ कामगिरीवर देखील लक्ष केंद्रित केले आहे.

**विश्वचषकाच्या दृष्टीने विचार**

पुढील वर्षी टी-२० विश्वचषक जिंकण्यासाठी भारतीय संघ पसंतीचा असेल आणि त्यानंतर एकदिवसीय विश्वचषकासाठी तो एक मजबूत दावेदार असेल, म्हणून आम्हाला हे प्रश्न लवकर सोडवायचे आहेत. ही परिस्थिती व्यवस्थापन आणि विराट कोहली आणि रोहित शर्मा सारख्या वरिष्ठ खेळाडूंमधील संवादाच्या अभावाकडे निर्देश करते. कोहलीने त्याची कसोटी निवृत्ती मागे घ्यावी अशी बीसीसीआयची इच्छा होती अशा अफवा होत्या, परंतु रविवारी रांची वनडेच्या समाप्तीनंतर या महान फलंदाजाने असा यु-टर्न घेण्याची शक्यता नाकारली आहे.

### आंद्रे रसेल आयपीएलमधून निवृत्त

। कोलकाता । वृत्तसंस्था ।

डब्ल्यूपीएल अर्थात वूमन्स प्रीमियर लीग स्पर्धेच्या चौथ्या मोसमासाठी २७ नोव्हेंबरला मेगा ऑक्शन पार पडलं. आयपीएलच्या १९ व्या हंगामासाठी मिनी ऑक्शन होणार आहे. त्याआधीच कोलकाता नाईट रायडर्सचा अनुभवी ऑलराउंडर आंद्रे रसेल याने याने आयपीएलमधून निवृत्ती घेत असल्याचं जाहीर केलं आहे. आंद्रे रसेल याने सोशल मीडियावर एक पोस्ट करत निवृत्त होत असल्याचं सांगितलंय. मात्र रसेल निवृत्तीनंतरही केकेआरच्या ड्रेसिंग रुमचा भाग असणार आहे. केकेआर फ्रँचायजीने आंद्रे रसेल याला काही दिवसांपूर्वीच करारमुक्त केलं होतं. त्यामुळे आंद्रे मिनी ऑक्शनमध्ये उतरणार अशी चर्चा होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)